cmyk

## संपादकीय

### तारतम्य अन् विश्वासार्हता ठेवावी लागेल !

बिहारमधील वादग्रस्त मतदारयादी पडताळणी कार्यक्रमानंतर आता देशातील १२ राज्यांमध्येदेखील ही मोहीम राबविण्याचा निर्णय निवडणूक आयोगाकडून घेण्यात आला आहे. मतदायाद्यांमधील त्रुटी दूर करण्याबरोबरच दरूस्त्या वा सुधारणांकरिता मतदार फेरतपासणी आवश्यकच ठरते.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८२ | गुरूवार, दि.३० ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### वडेट्टीवार यांना आयकर विभागाची नोटीस

मुंबई : काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांना आयकर विभागाने नोटीस पाठवली आहे. विजय वडेट्टीवार यांनी एका कार्यक्रमात बोलताना ही माहिती दिली. नागपूरमध्ये ओबीसी आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चाआधी ही नोटीस मिळाल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले. लोकांसाठी उठवलेला आवाज दाबण्यासाठी सरकार त्यांच्या एजन्सींचा गैरवापर करत आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. ही नोटीस म्हणजे ओबीसी आणि सामान्य लोकांच्या हक्कांसाठी उभे राहणा–यांना धमकावण्याचा स्पष्ट प्रयत्न आहे. पण आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा विजय वडेट्टीवार यांनी सरकारला दिला.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राफेल भरारी !

नवी दिल्लीः देशाच्या तिन्ही सेनादलांच्या प्रमुख असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवार (२९ ऑक्टोबर) भारतीय हवाई दलाचे अत्यंत शक्तिशाली आणि अत्याधुनिक लढाऊ विमान असलेल्या राफेल फायटर जेटमधून उड्डाण घेत इतिहास रचला. यापूर्वी एपीजे अब्दुल कलाम यांनी देखील फायटर जेटमधून उड्डाण केले होते. राष्ट्रपती मुर्मू यांनी अंबाला एअरबेसवरून राफेलमधून उड्डाण केले. त्यांच्यासोबत एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग हेदेखील विमानात उपस्थित होते. राष्ट्रपतींनी राफेलमधून केलेली ही भरारी अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. यापूर्वी ८ एप्रिल २०२३ रोजी राष्ट्रपती मुर्मू यांनी आसाममधील तेजपूर एअरफोर्स स्टेशनवरून सुखोई–३० मधून उड्डाण घेतले होते. मात्र, राफेल फायटर जेटमधून प्रवास करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत.

### तात्काळ ई–केवायसी करा अन्यथा लाभ होणार बंद

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळण्यासाठी ई–केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत लाखो महिलांनी ई–केवायसी पूर्ण केली असून उर्वरित लाभार्थी भगिनींनीही १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असे मी सर्वांना आवाहन करते, असे आदिती तटकरे म्हणाल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेदरम्यान, अनेक फसवणुकीचे प्रकार समोर आले. यानंतर राज्य सरकारकडून योग्य ती खबरदारी घेत पडताळणी सुरू केली आहे. याचदरम्यान आता लाडकी बहीण योजनेसाठी ई–केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यानुसार आता लाडक्या बहिणींना दरवर्षी केवायसी करावी लागणार आहे.

### २४ तासांत सोन्याचा भाव ४ हजारांनी घसरला

मुंबईः पुन्हा एकदा सोन्याच्या दरात घसरण झाली असून ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सोन्याच्या दरात सातत्याने मोठी वाढ होताना दिसत आहे . हे दर १ लाख ३५ हजार एवढ्या विक्रमी उंचीवर जाऊन पोहोचले होते. मात्र गेल्या दहा दिवसांपासून सोन्याच्या किमती घसरताना दिसत आहेत. बुधवारी गेल्या २४ तासात जळगावच्या सराफा बाजारात एक लाख २२ हजार ५०० रुपयांवरून सोन्याचा दर एक लाख १८ हजार ५०० रुपयांवर पोहोचला. अमेरिकेचा अर्थव्यवस्थेबाबत मिळत असलेल्या नव्या संख्येतांमुळे मल्टी कमोडिटी एक्सचेंज वर सोन्याचे दर घसरले आहेत.

# शेतकऱ्यांचा प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन थांबणार नाही!

## सरकारने नागपुरात येऊन चर्चा करावी–बच्चू कडू



### बच्चू कडू यांना राष्ट्रीय महामार्ग रिकामा करण्याचे उच्च न्यायालयाने आदेश

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू आणि त्यांच्या समर्थकांना संपूर्ण कर्जमाफीसाठी रोखलेल्या शहराच्या बाहेरील वर्धा रोड रिकामा करण्याचे निर्देश दिले. राष्ट्रीय महामार्ग ४४ (वर्धा रोड) या आंदोलनामुळे लोकांना होणाऱ्या प्रचंड गैरसोयींबद्दल वृत्तपत्रांमध्ये आलेल्या वृत्तांची उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली. वृत्तपत्रातील वृत्तांचा हवाला देत न्यायमूर्ती रजनीश व्यास म्हणाले की, या आंदोलनामुळे २० किमीपर्यंत वाहतूक कोंडी झाली आहे आणि रुग्णवाहिका आणि पोलिसांच्या गाड्याही जाऊ शकत नाहीत.

नागपूर । प्रतिनिधी

**नागपूरात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आणि** कार्यकर्त्यांनी मोठे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, दिव्यांग, मच्छीमार आणि मेंढपाळ बांधवांच्या हक्कांसाठी राज्यभरातून कार्यकर्त्यांचा जमाव नागपुरात एकत्र आला आहे. गेल्या २ **दिवसांपासून शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी नागपूर–वर्धा आणि जबलपूर–हैदराबादसह इतर चार महामार्ग रोखून धरले आहे, परिणामी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे १५ तासांहून अधिक काळ अनेक वाहने महामार्गावर अडकून पडले आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांचा प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन थांबणार नाही, सरकारने नागपुरात येऊन चर्चा करावी असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.**

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली हजारो निदर्शक महा एल्गार मोर्चामध्ये सहभागी होत आहेत. यावेळी बच्चू कडू म्हणाले की, वेळ पडली तर रक्त वाहण्याची गरज पडली तरी आम्ही आमच्या छातीवर गोळ्या घ्यायला तयार आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाहीत असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, आम्हाला मुंबईला बोलावून

▶▶ पान २ वर

## मतांसाठी मोदी नाचायलाही तयार–राहुल गांधी

मुझफ्फरपूर । वृत्तसंस्था



बिहार निवडणूक प्रचाराची जोरदार सुरुवात करताना, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निर्भयपणे हल्ला चढवला आणि ते ''मतांसाठी काहीही'' करत असल्याचा आरोप केला. राहुल गांधी म्हणाले की, जर तुम्ही नरेंद्र मोदी यांना तुमच्या मतांच्या बदल्यात नाचायला सांगितले तर ते स्टेजवर नाचतील, असा उपरोधिक टोलाही यावेळी त्यांनी लगावला. राहुल गांधी मुझफ्फरपूर येथे राजद नेते आणि महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांच्यासमवेत संयुक्त सभेला संबोधित करताना बोलत होते.

विधानसभा निवडणुकीला फक्त एक आठवडा उरला असताना, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर हल्ला चढवला. नुकत्याच संपलेल्या छठ पूजा, बिहारी लोकांसाठी सर्वात मोठा उत्सव, याकडे लक्ष वेधत, त्यांनी

▶▶ पान २ वर

## राहुल गांधी यांचा डॉ.संपदा मुंडेंच्या कुटुंबियांशी फोनवरून संवाद

# न्यायाच्या लढाईत पाठीशी असल्याचे दिले आश्वासन

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ थेट डॉ.संपदा मुंडे यांच्या गावात



वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कन्या डॉक्टर संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून ती हत्या आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. डॉक्टर संपदाने दबाव व छळाला कंटाळून आयुष्य संपवले. या प्रकरणी एसआयटी स्थापन करून करून हाय कोर्टाच्या न्यायाधिशांमार्फत चौकशी केली पाहिजे तसेच भाजपाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना तात्काळ अटक करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातल्या कवडगाव येथे जाऊन फलटण येथे आत्महत्या केलेल्या डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.यावेळी त्यांच्यासोबत युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभान, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रा. सुशीलाताई मोराळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रदेश

▶▶ पान २ वर

## दम असेल तर निवडणूक थांबवून दाखवा -ॲड. गुणरत्न सदावर्ते

मुंबई । प्रतिनिधी



महाराष्ट्रातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटींवरून विरोधकांनी निवडणूक आयोग आणि भाजपा सरकारवर हल्लाबोल केला आहे. १ नोव्हेंबरला मुंबईत महाविकास आघाडी व सर्वपक्षीय विरोधकांच्या संयुक्त मोर्चात मनसे प्रमुख राज ठाकरे सहभागी होणार असल्याची घोषणा झाल्याने राजकीय वातावरण तापलं आहे. मात्र, या मोर्चावर ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी कडाडून टीका केली आहे. राज, उद्धव, शरद पवार म्हणतात म्हणून मुंबईत गैरकाम चालणार नाही. हा सत्याचा नव्हे, ढोंग्याचा आणि लबाडांचा मोर्चा आहे, असे म्हणत सदावर्ते यांनी विरोधकांना लक्ष्य केले.

▶▶ पान २ वर

# डॉ. मुंडे प्रकरणात बीडमध्ये टॉवरवर चढून आंदोलन!

बीड । प्रतिनिधी

**फलटण येथील हॉटेलमध्ये आत्महत्या केलेल्या वडवणी तालुक्यातील डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यू प्रकरणी बीड जिल्ह्यात संताप उसळला आहे. न्याय मिळावा या मागणीसाठी बुधवारी नागरिक आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत भाजी मंडई परिसरातील टॉवरवर चढून जोरदार आंदोलन केलं. जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही असा इशारा या आंदोलनकर्त्यांनी दिला. यामुळे भाजी मंडई परिसरात तणावाचे वातावरण**



**निर्माण झाले दरम्यान, पोलिसांनी तत्परता दाखवीत येथे मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला.**

वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील महिला डॉक्टरने पोलिसातील अधिकारी आणि आणखी एका व्यक्तीच्या त्रासावरून फलटणच्या एका हॉटेलमध्ये आत्महत्या केली. ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा आरोप डॉक्टर महिलेच्या कुटुंबाने केला आहे. या सगळ्या प्रकरणाचा तपास सुरू असताना, बीड जिल्ह्यामध्ये मोठे जनआंदोलन उभे राहत आहे. बीडच्या लेकीला न्याय मिळावा या उद्देशाने सर्व जाती धर्मातील लोक आंदोलन करताना दिसत आहेत. बीड शहरामध्ये भाजी मंडई ते बशीरगंज चौक दरम्यान बीएसएनएलचे मोठे टॉवर आहे. या टॉवरवर चढून आज आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी परिसरात ''डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळालाच पाहिजे'',

▶▶ पान २ वर

# चिखली येथील आई लक्ष्मीमाता मंदिर सुशोभीकरणासाठी ५० लाखांचा निधी मंजूर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धार्मिक पर्यटन स्थळांच्या उभारणीला मोठी चालना मिळाली असून प्रादेशिक पर्यटन विकास योजना (२०२५२६) अंतर्गत या योजनेतून आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने चिखली ग्रामस्थांच्या अस्मितेचे व श्रद्धेचे प्रतीक असलेल्या ग्रामदैवत श्री लक्ष्मीमाता मंदिराच्या सुशोभीकरणासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आले असून चिखली ग्रामस्थ, श्रद्धावंत भाविक आणि मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश अण्णा धस प्रतिष्ठानच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

आष्टी तालुक्यातील चिखलीसह परिसरातील





नागरिकांच्या अखंड श्रद्धेचे व आध्यात्मिक बळाचे केंद्र असलेले आईलक्ष्मीमाता मंदिर हे वर्षानुवर्षे भक्तांच्या भावविश्वात नांदत आहे. मंदिरात दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात.या पवित्र स्थळाच्या सुशोभीकरणामुळे परिसराला नवचैतन्य लाभणार असून

▶▶ पान २ वर

# सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा मंत्री पंकजा मुंडे, गिरीष महाजन यांनी घेतला आढावा

नाशिक / मुंबई । प्रतिनिधी

नाशिकमध्ये होऊ घातलेला कुंभमेळा पावसाळ्यात होत असल्याने विशेष खबरदारी घेण्याची आवश्यकता असून, प्रशासनाने सर्व शक्यतांची पडताळणी करून कार्यवाही करावी, असे निर्देश कुंभमेळा मंत्री तथा मंत्री समितीचे प्रमुख गिरीश महाजन यांनी दिले. १२ वर्षांपूर्वीच्या कुंभमेळ्याचा अनुभव लक्षात घेता यावेळी येणाऱ्या भाविकांची संख्या अधिक असल्याने त्या दृष्टीने सूक्ष्म नियोजन राज्य शासनाच्या वतीने करण्यात येत असून या माध्यमातून नाशिकचा देशभरात लौकिक वाढेल, असा विश्वास महाजन यांनी व्यक्त

▶▶ पान २ वर






# राष्ट्रवादीचे मेहबूब शेख यांना निंबाळकरच्या कार्यकर्त्यांकडून जिवे मारण्याची धमकी

बीड/मुंबई । प्रतिनिधी

**फलटण येथे घडलेल्या बीड जिल्ह्याच्या कन्या डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शेख महबूब यांनी आवाज उठवला होता या सोबतच माजी खासदार निंबाळकर यांच्यावर आरोप केल्यानंतर आज निंबाळकर यांच्या कार्यकर्त्यांनी शेख मेहबूब यांना भ्रमणध्वनीवर जीवे मारण्याची धमकी दिली या धमकीचा व्हिडिओ ऑडिओ सोशल मीडियावर वायरल होत आहे,**

कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड येथील डॉक्टर संपदा मुंडे हिने तेथील प्रशासनाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याचे प्रकरण बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभर आणि देशभर गाजत आहे याच प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष शेख महबूब यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणातील निंबाळकर



संशयित स्वराज्य सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजपचे माजी खासदार निंबाळकर यांच्यावर आरोप केले होते ते या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचेही म्हटले होते यानंतर अनेक प्रकरणे निंबाळकरांची बाहेर आली मात्र आज शेख महबूब यांना भ्रमणध्वनी द्वारे

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ८१.०० क्विंटल | २,३५० | २,८३६ | २,६५६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | २,१०० | २,८९० | २,५२७ |
| मका/लोकलः ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,९४६ | ६,९४६ | ६,९४६ |
| उडीद : ३३.५० क्विंटल | ४,२०१ | ५,१५१ | ४,७८३ |
| बाजरीः ११५.५० क्विंटल | १,९०० | ५,००० | २,६६६ |
| मुगः३.५० क्विंटल | ५,८११ | ५,८११ | ५,८११ |
| सोयाबीनः २५२.०० क्विंटल | ३,९०० | ४,३०० | ४,१८९ |
| हरभराः १.०० क्विंटल | ४,९५१ | ४,९५१ | ४,९५१ |

cmyk

## अग्रलेख

# तारतम्य अन् विश्वासार्हता ठेवावी लागेल !

बिहारमधील वादग्रस्त मतदारयादी पडताळणी कार्यक्रमानंतर आता देशातील १२ राज्यांमध्येदेखील ही मोहीम राबविण्याचा निर्णय निवडणूक आयोगाकडून घेण्यात आला आहे. मतदायाद्यांमधील त्रुटी दूर करण्याबरोबरच दरूस्त्या वा सुधारणांकरिता मतदार फेरतपासणी आवश्यकच ठरते. किंबहुना, या प्रक्रियेमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ न देता यात पारदर्शकता ठेवणे, ही आयोगाची सर्वांत मोठी जबाबदारी असेल. बिहारसारख्या राज्यामध्ये अलीकडेच मतदारयादी फेरतपासणी करण्यात आली. मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी, त्यातील त्रुटी दूर व्हाव्यात, बोगस मतदानाला आळा बसावा, यासाठी या दृष्टीने आयोगाकडून काही उपाययोजना होत असतील, तर त्यात काही गैर नाही. मृत, दुबार वा बोगस नावे वगळणे हे योग्यच. परंतु, अशा उपाययोजना करताना तारतम्यही बाळगावे लागते. बिहारमध्ये ते बाळगण्यात आले का, हा अजूनही प्रश्नच आहे. बिहारमध्ये यादीतून ६५ लाख लोकांना बाहेर काढण्यात आल्याचा मुद्दा बराच गाजला. हजारो नावांची पुनर्तपासणी झाली. पण, काही ठिकाणी मतदारांची नावेच गायब झाल्याच्या तक्रारी आल्या. त्यावर विरोधकांकडूनही आक्षेप घेण्यात आले. त्यामुळे एकूणच या प्रक्रियेबाबत काहीसे संभ्रमाचे वातावरण राहिल्याचे दिसून आले.

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश. देशात ९५ कोटीहून अधिक मतदार असल्याचे सांगण्यात येते. स्वाभाविकच मतदारयादी तयार करणे, हेही शिवधनुष्य पेलण्यासारखे होय. प्रत्येक निवडणुकीत वा मतदान प्रक्रियेदरम्यान मतदारांकडून तक्रारी येतच असतात. नाव यादीत नसल्याने अनेकांना मतदान करता येत नाही. तर काही ठिकाणी मृतांची नावे कायम राहतात. तर काही ठिकाणी एका मतदाराची विविध ठिकाणी नावे असतात. त्यांच्या नावावर कित्येकदा बोगस मतदानही होते. हे सगळे टाळण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या फेरतपासणीत काही उणिवा राहू शकतात. पण, या उणिवा मोठ्या प्रमाणात असतील, तर सर्वसामान्यांच्या मनात शंकेला जागा राहतेच. निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेची असो वा लोकसभेची. निवडणुकीत प्रत्येक मताला महत्त्व असते. त्यामुळे यादीतून लाखो नावे वगळली जात असतील, तर त्याबाबत शंका कुशंका निर्माण होणे, हे स्वाभाविक ठरते. हे बघता तपासणी अतिशय काटेकोर असायला हवी. बोगस मतदान होऊ नये म्हणून एखाद्या खऱ्याखुऱ्या मतदाराचे नाव वगळणे न्याय नाही, याचे भान हवे. हे बघता बिहारच्या मतदारयादी फेरपडताळणीपासून धडा घेत आयोगाने १२ राज्यांच्या तपासणीवेळी योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

दुसऱ्या टप्प्यात अंदमान-निकोबार बेटे, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पदुच्चेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये तपासणी होत आहे. हा देशातील २००२-०४ नंतरचा सर्वांत मोठा मतदारयादी सुधारणा कार्यक्रम असेल. प्रत्येक पात्र उमेदवाराचे नाव यादीत असावे आणि अपात्र नावे वगळली जावीत, हाच या मोहिमेचा उद्देश आहे. स्थलांतर, नागरीकरण आणि लोकसंख्येतील बदलांमुळे अनेक राज्यांतील मतदार याद्या कालबाह्य झाल्या आहेत. त्यामुळे त्यात अनेक त्रुटी राहिल्या असून, मतदारयाद्या अद्ययावत कराव्या लागत आहेत, असे आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी म्हटले आहे. आयोगाचा हा उद्देश रास्तच असून, त्यानुसार आयोग प्रामाणिकपणेच काम करेल, अशी प्रत्येकाला अपेक्षा असेल. बिहारमध्ये मतदारांचे अर्ज भरून घेताना मागितलेल्या दस्तऐवजांमुळे गोंधळ झाला होता. स्वत: याची कबुली ज्ञानेशकुमार यांनी दिली. आता तब्बल ५१ कोटी मतदारांची फेरतपासणी करावी लागणार आहे. त्यामुळे कशी आणि काय दक्षता घ्यायला पाहिजे, यावर आत्तापासूनच आयोगाने काम केले पाहिजे. निवडणूक आयोग ही स्वायत्त व घटनात्मक संस्था आहे आणि या संस्थेने घटनात्मक चौकटीतच काम केले पाहिजे. तथापि, अधूनमधून या संस्थेच्या कार्यपद्धतीबद्दल आक्षेप घेतले जातात. मुख्य म्हणजे ही संस्था सरकारच्या हातातील बाहुले तर नाही ना, असा संशय व्यक्त करण्यात येतो. निवडणूक आयोगासारख्या लोकशाहीतील महत्त्वाच्या संस्थेबद्दल अशी शंका निर्माण होणे, हे चांगले लक्षण नाही. खरे तर अलीकडे सातत्याने मतचोरीसह विविध मुद्द्यांवर या संस्थेला प्रश्न विचारले जात आहेत. वास्तविक आयोगानेही यावर समाधानकारक उत्तरे दिलेली दिसत नाहीत. मतदानयंत्राबद्दल कुणी सवाल करीत असेल, तर त्याच्यासमोरही पुराव्यासह सादरीकरण व्हायला पाहिजे. मात्र, यामध्ये कुठेतरी ही संस्था कमी पडते का, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता धोक्यात असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. तृणमूल काँग्रेस व द्रमुकनेही फेरतपासणीला विरोध केला आहे.

लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधक हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. सत्ताधाऱ्यांनी सत्ता गाजवताना केवळ दडपशाही करणे लोकशाहीमध्ये बसत नाही. तसे विरोधकांनीही विरोधाला विरोध करणे योग्य नाही. म्हणून फेरतपासणी मोहिमेत विरोधकांनीही आयोगाला सहकार्य करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर आयोगानेही विरोधकांना विश्वासात घ्यायला हवे. आयोग कुणाचा बटीक नाही. सत्ताधारी व विरोधक दोन्ही आम्हाला सारखेच आहेत. आम्हाला केवळ पारदर्शकपणे तपासणी मोहीम राबवण्यात रस आहे, हे निवडणूक आयोगाने विरोधकांना पटवून द्यायला हवे. मागच्या काही दिवसांत विरोधकांनी आरोप करायचे आणि सत्ताधाऱ्यांनी त्याची उत्तरे द्यायची, असा खेळ सुरू आहे. त्यामुळे निवडणूक आयोगासारख्या संस्थेबद्दल आणखीनच संशयाचे वातावरण तयार होत असल्याचे दिसून येते. म्हणूनच विरोधकांच्या प्रश्नांची सत्ताधाऱ्यांनी नव्हे, तर आयोगानेच उत्तरे द्यायला हवीत.

# आष्टीचा महेश साखर कारखाना कामधेनु विरोधकांनी आडकाठी आणु नये-भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी मतदार संघाची नव्हे तर शेजारील तालुक्याची देखील कामधेनू असलेला महेश सहकारी साखर कारखाना गेल्या अनेक वर्षापासून बंद अवस्थेत होता अक्षरशा कारखान्याची भंगारगत अवस्था झाली असताना देखील आपल्या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मी महेश सहकारी साखर कारखाना बंद बँकेकडे घाण असताना २५ कोटी रुपये बँकेचे अदा करून कारखाना सोडून घेतला यामध्ये शासनाच्या बंद पडलेल्या कारखान्याला पुनर्जीवित करण्यासाठी स्कीम होते त्या स्कीमचा देखील मला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला मी कारखान्याचे काम चालू केले मात्र आष्टी मतदार संघातील काही राजकारणांना चांगल्या कामात आडवा पाय घालणयाची सवय आहे महाराष्ट्रात नव्हे तर अवघ्या देशात बंद पडलेल्या कारखान्याच्या यादीमधील महेश सहकारी साखर कारखाना हा पहिला कारखाना असेल त्याची परवानगी रद्द झाली आहे असे प्रतिपादन पत्रकार परिषद घेऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले त्यांची नेहमीची सवय आहेआज पर्यंत मी कधीच सत्तेत असताना कुणाचेच कामे आडवली नाहीत आणि आता मी कारखाना सुरू करीत असतांना तालुक्यातील राजकारण्यांनी कुरघोडी व आडवा आडवी न करता मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी येथील भगवान महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले.**

माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पत्रकारांशी पुढे बोलताना सांगितले की, आष्टी तालुक्यातील महेश सहकारी साखर कारखान्याचा परवाना साखर आयुक्त यांनी कसलीच पुर्व कल्पना न देता रद्द केला आहे यासंदर्भात आम्ही देखील हायकोर्टात अपील केली आहे मात्र दिवाळीच्या सुट्ट्या असल्याकारणाने कोर्टाच्या कामाला विलंब लागत आहे. त्याविरोधात दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसह धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. पहिल्या पिढीतील कारभारी मंडळी यांनी हा कारखाना उभारणीत श्रीपती कदम, भाऊसाहेब आजबे, साहेबराव थोरवे यांचे मोठे योगदान असून, त्यानंतर मी आमदार असतांना हा कारखाना निवडणुकीत जिंकलो आणि जवळपास २५ वर्ष हा कारखाना मी चालविला. त्यानंतर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली अन आपल्या कारखान्यासह राज्यातील बरेच कारखाने बंद पडले.त्यामुळे हा कारखाना



आवसायानात निघाला होता. आता परत आपण ओटीएस मधून रितसर हा कारखाना पैसे भरून घेतला आहे.पण यामध्ये राजकारण करत हा कारखाना सुरू न व्हावा म्हणून सत्ताधारी आमदार खोडा घालत असल्याचा आरोपही त्यांनी केला. खाजगी कारखान्याचा आणि सहकारी कारखान्याचा काहीही संबंध नसतांना या कारखान्याचा परवाना कमी अंतर असल्याचे कारण दाखवून हा परवाना रद्द करण्यात आला आहे.परंतु सहकारी साखर कारखान्याचा परवाना रद्द करण्याची घटना राज्यात पहिली घटना असल्याचेही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले. मी वयाच्या २४ व्या वर्षी मतदार संघाचा आमदार झालो त्यावेळेस पासूनच मी राजकारण करतो मतदार संघाचे लोकप्रतिनिधी म्हणून जवळपास वीस वर्ष नेतृत्व केले.पण या सत्तेच्या काळात कुणाचेच काम आडवले नाही आणि चालू काम तर कधीच बंद पाडले नाही.कारण तशी सवय आपल्याला नाही असा टोला आमदार यांना नाव न घेता माजी आमदार भीमराव धोंडे यांनी लगावला आहे. कारखाना व्यतिरिक्त आमच्या प्रतिनिधींनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना प्रश्न विचारला असता मागच्या काही दिवसापूर्वी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा गटामध्ये प्रवेश करणार असल्याच्या काही दैनिकांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाले आहेत यावर भीमराव धोंडे म्हणाले की मी मागची विधानसभा ही अपक्ष लढल्याकारणाने भारतीय जनता पार्टीने मला पक्षातून काढून टाकले आहे तरी देखील मी आता सत्ताधारी पार्टी मध्येच प्रवेश करणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या आधी मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा गट अथवा शिवसेना एकनाथ शिंदे गट अशा दोन सत्ताधारी पक्षांच्या मोठ्या नेत्यांवर माझ्या बैठकी झाल्या आहेत बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे हे देखील माझ्या निवासस्थानी येऊन मला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये येण्यासाठी मागणी करत आहे मागच्या काही दिवसापूर्वी धनंजय मुंडे व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार यांच्याशी माझी मुंबईमध्ये बैठक झाल्याची ही त्यांनी सांगितले मी राजकारण करत असताना नेहमीच आडवा आडवीचे व कुटनीतीचे राजकारण केले नाही माझा प्रामाणिक प्रयत्न आहे आपल्या तालुक्यातील ही महेश सहकारी साखर कारखाना ही कामधेनू आहे ही कामधेनू मला पुन्हा पुनर्जीवित करायची आहे कडा कामगारांचे काही थकीत पगार असून ते शासन निर्णय प्रमाणे कारखाना सुरू झाल्यानंतर मी टप्प्याटप्प्याने अदा करेल असे देखील त्यांनी पत्रकारांना सांगितले परवा होणाऱ्या बीड येथील धरणे आंदोलनास ऊस उत्पादकांनी तसेच सर्व पक्षी पुढाऱ्यांनी देखील सहभाग नोंदवून ही कामधेनु वाचवण्यासाठी मला सहकार्य करावे असे माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले. आष्टी मतदार संघामध्ये ही कारखान्याची वास्तू उभ्या करण्यासाठी त्या वेळेचे तात्कालीन पालकमंत्री सुंदरराव सोळुंके यांनी पहिला प्रयत्न केला शेअर्स गोळा करण्यासाठी भाऊसाहेब वाळके असतील माजी आमदार निवृत्ती उगले असतील भाऊसाहेब आजबे माजी आमदार गहिनाथ पाटील शिलपतराव कदम साहेब तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य स्वर्गीय रेडेकर गुरुजींनी देखील कडा सहकारी साखर कारखान्यासाठी मोठ्या प्रमाणावर खेड्यापाड्यातून शेअर्स गोळा केले होते.

# मराठवाडा पुन्हा अतिवृष्टीच्या तडाख्यात!

## ५ जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा धुमाकूळ ;नद्यांना पूर, धरणांचे दरवाजे उघडले

बीड । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाचा जोर कायम आहे. गेल्या २४ तासांत विशेषत: मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, परभणी या पाच जिल्ह्यातील ४० मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. लातूर जिल्ह्याच्या देवणी तालुक्यातील बोरोळ मंडळात सर्वाधिक १६३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, मराठवाडा पुन्हा अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडल्याचे दिसत आहे. या पावसामुळे अनेक नद्यांना पूर आला असून, मराठवाड्यातील अनेक महत्वाच्या धरणाचे दरवाजे उघडले गेले आहेत.**

लातूर जिल्ह्याच्या देवणी तालुक्यातील बोरोळ मंडळात सर्वाधिक १६३ मिलिमीटर पाऊस झाला असून, रेणापूर तालुक्यातील पाच महसूल मंडळात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला आहे. तर बीड, लातूर जिल्ह्यात पावसाचा जोर अधिक असल्याचे दिसून आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चित्तेपिंपळगाव मंडळात, जालना तालुक्यातील विरेगाव, परतूर तालुक्यातील परतूर मंडळात अतिवृष्टी झाली आहे. बीड जिल्ह्याच्या अंबोजोगाई तालुक्यातील अंबाजोगाई, लोखंडी, घाटनांदूर, बर्दापूर, केज तालुक्यातील होळ, बनसारोळा, परळी तालुक्यातील परळी, नागपूर, लातूर जिल्ह्याच्या लातूर तालुक्याच्या लातूर, बाभळगाव, कासारखेडा मंडळात, अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर, खंडाळी, किनगाव, अंधोरी, निलंगा तालुक्यातील निलंगा, निटूर, औराद, कासार बालकुंदा, अंबुलगा, हलगरा, भातांगळी मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. उदगीर तालुक्याच्या मोघा, हेर, तोंडार, झरी, रेणापूर तालुक्याच्या रेणापूर, पोहरेगाव, पानगाव, कारेपूर, पळशी, देवणी तालुक्यातील देवणी, बोरोळ, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हिसमाबाद, परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यातील माखणी, पिंपळदरी मंडळात अतिवृष्टी झाली आहे. या मुसळधार पावसाने खरीप पिकांचे नुकसान झाले. तर रब्बी पेरणीही खोळंबली आहे. नदी, नाल्यांना पूर येऊन, नदीकाठच्या शेतपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. भाजीपाला आणि फळबागांना अवकाळीचा फटका बसला आहे. पुढील दोन दिवसात धुळे, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# कोल्हापुरी चप्पलमध्ये आता क्यआर कोड, एनएफसी चीप

कोल्हापूर । प्रतिनिधी

विज्ञान युगात उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रांतील प्रत्येकाने बदल स्वीकारले पाहिजेत. बदल न स्वीकारल्यामुळे अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या इतिहासजमा झाल्या. कोल्हापुरी चप्पल उद्योगानेही काळानुरूप परिवर्तन करावे. अन्यथा तर आपण नामशेष होऊ, असा इशारा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी दिला. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या सभागृहात कोल्हापुरी चप्पल उत्पादक, कारागीर आणि व्यावसायिकांसाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. माणगावे म्हणाले, कोल्हापुरी चप्पल ही केवळ परंपरा नाही, तर कोल्हापूरचा जागतिक ओळख निर्माण करणारा वारसा आहे. या वारशाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा प्रश्न सुटेपर्यंत

नागपुरातील आंदोलन स्थगित करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी आम्हाला भीती आहे. आमच्या २२ मागण्या आहेत त्या सरकारने पूर्ण कराव्यात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी नागपुरात येऊन चर्चा करावी; आम्ही मुंबईला जाणार नाही. नागपुरातून आम्ही मुंबईकडे निघालो, तर या आंदोलनाचे काय होणार?'' असाही प्रश्न कडूंनी उपस्थित केला आहे. नेपाळमध्ये जसे काही मंत्री देश सोडून पळून गेले होते, तसेच इथेही परिस्थिती निर्माण करु, असे वक्तव्य करून रविकांत तुपकर यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. त्यांनी नागपूरनंतरचा पुढचा टप्पा मुंबईत करत, या हरामखोरांना मुंबई आणि महाराष्ट्रातून जावे लागेल असा इशाराही रविकांत तुपकरांनी दिला. तुपकर पुढे म्हणाले की, आता शेतकऱ्यांनी आत्महत्या करायच्या नाहीत. कितीही संकटं आली तरी मरायचं नाही. आमदारांना कापा, असं बच्चू कडू म्हणाले होते, पण मी सांगतो की दोन-चार मंत्र्यांना कापा. त्यांनी पुढे म्हटले की, बंदुकीच्या गोळ्या कमी पडतील, पण नागपुरात आमच्या छात्या कमी पडणार नाहीत.

**या आहेत मागण्या**

शेतकऱ्यांचे सर्व कर्ज कोणत्याही अटीशिवाय तात्काळ माफ करावे. नियमित कर्जफेड करणाऱ्यांसह सर्वांचा सातबारा कोरा करावा. पिककर्ज, पॉलीहाऊस, शेडनेट, सिंचन, जमीन सुधारणा यासह सर्व कर्जे माफीत समाविष्ट करावीत. उसाला ९% रिकव्हरीसाठी ४३०० रुपये आणि प्रत्येक टक्क्यासाठी ४३० रुपये एफआरपी द्यावी. थकीत एफआरपी रक्कम तात्काळ वितरित करावी. कांद्यासाठी किमान ४० रुपये किलो भाव द्यावा व निर्यातबंदी कायमची रद्द करावी. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा; गायीच्या दुधाला ५० रुपये, म्हशीच्या दुधाला ६५ रुपये दर लागू करावा. दुध क्षेत्रासाठी एफआरपी आणि रेव्हन्यू शेअरिंग धोरण लागू करावे. दुधातील भेसळ रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करावी. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून कृषी मालाला हमीभावावर २०% अनुदान द्यावे. ग्रामीण घरकुलांसाठी ५ लाख रुपये अनुदान मिळावे. पेरणीपासून कापणीपर्यंतचा खर्च मनरेगातून भागवावा. नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा. दिव्यांग, निराधार, विधवा आणि अनाथांना दरमहा ६ हजार रुपये मानधन द्यावे. मेंढपाळ आणि मच्छीमारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करावे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा. बेरोजगार युवांना नोकरीच्या संधी द्याव्यात. विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना वीजबिल माफ करावे. अपंग, वयोवृद्ध व विधवा महिलांसाठी नियमित अनुदान द्यावे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात सुधारणा कराव्यात. नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना तात्कीळ मदत द्यावी.

------------

### मतांसाठी मोदी नाचायलाही

दिल्लीतील प्रदूषित यमुनेत प्रार्थना करणाऱ्या भाविकांच्या द्विभाजनाकडे लक्ष वेधले. मोदी स्विमिंग पूलमध्ये आंघोळ करायला गेले, त्यांचा यमुनेशी काहीही संबंध नाही. त्यांचा छठ पूजेशी काहीही संबंध नाही. त्यांना फक्त तुमचे मत हवे आहेत, असा आरोपही यावेळी त्यांनी केला. राहुल गांधी यांनी २० वर्षे बिहारमध्ये राज्य करूनही मागासवर्गीयांसाठी ''काहीही न केल्याबद्दल'' त्यांनी नितीश कुमार यांना फटकारले, आणि नंतर भाजपाने राज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जेडीयू प्रमुखांच्या प्रतिमेचा ''दुरुपयोग'' केल्याचा आरोप केला. पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, नितीशजींचा चेहरा वापरला जात आहे. रिमोट कंट्रोल भाजपाच्या हातात आहे. तुम्ही असा विचार करू नये की तिथे सर्वात मागास लोकांचा आवाज ऐकू येतो. भाजपा यांच्या हातात रिमोट कंट्रोल आहे आणि त्यांचा सामाजिक न्यायाशी काहीही संबंध नाही, नसल्याचे सांगितले. राहुल गांधी यांनी यावेळी मत चोरी आरोप पुन्हा केला आणि इशारा दिला की बिहारमध्येही असाच प्रयत्न केला जाऊ शकतो. ते तुमची मते चोरण्यात गुंतले आहेत. त्यांनी महाराष्ट्रात निवडणुका चोरल्या, हरियाणात निवडणुका चोरल्या आणि ते बिहारमध्ये त्यांचे सर्वोत्तम प्रयत्न करतील, असे ते म्हणाले.

-------------

### न्यायाच्या लढाईत पाठीशी

सरचिटणीस दादासाहेब मुंडे, औरंगाबाद जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष दीपाताई मिसाळ,प्रदेशाचे उपाध्यक्ष राजेंद्र राख, जिल्हा सरचिटणीस प्रवीण कुमार सेप, नारायण होके, दत्ता कांबळे, रंगनाथ निकम, शामसुंदर जाधव, काँग्रेसचे वडवणी तालुका अध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. मुंडे यांच्या प्रतिमेला अभिवादन करत कुटुंबीयांची भेट घेऊन संवाद साधला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावेळी पीडित मुलीची आई व मुंडे कुटुंबातील लोकांशी फोनवरून संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. घाबरु नका आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष सरकारवर दबाव आणेल, असे आश्वासन त्यांनी दिले. राहुल गांधी यांनी संपदाच्या कुटुंबियांकडून व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडून या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली. याभेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, डॉक्टर संपदा मुंडे यांच्यावर चुकीचे कामे करण्यासाठी प्रचंड दबाव आणला जात होता, त्यांचा प्रचंड छळ करण्यात आला. नाईक निंबाळकर यांच्या गुंडगिरीच्या अनेक घटना प्रकाशात आल्या आहेत. या घटनेतील कळस म्हणजे चौकशी करण्याआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रणजितसिंह निंबाळकर यांना जाहिर क्लिन चिट देऊन टाकली हे संताप आणणारे आहे. या प्रकरणाची चौकशी फलटण बाहेर करावी, उच्च पदस्थ महिला अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशी मागणी असून काँग्रेस पक्ष गप्प बसणार नसून, डॉ. संपदा मुंडेला न्याय मिळवूण देण्यासाठी रस्त्यावर उतरेल. दिल्लीत युवक काँग्रेसने आंदोलन केले आहे. महिला काँग्रेसही याप्रकरणी राज्यभर आंदोलन करेल, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

**महिला आयोगाची भुमिका संताप आणणारी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, या प्रकरणी महिला आयोगाची भूमिकाही संताप आणणारी असून पीडित कुटुंबाला भेटून त्यांच्याकडून माहिती घ्यायला हवी होती पण त्यांनी आधी पोलीसांची भेट घेऊन सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. महिला आयोगाने महिलांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन काम करणे गरजेचे आहे पण त्यांनी तसे न करता पोलिसांची वकिली केली.

**डॉक्टर ज्या समाजाच्या त्या समाजाचे नेते काहीच बोलत नाहीत**

डॉ. संपदा मुंडे ज्या समाजाच्या आहेत त्या समाजातील एकही लोकप्रतिनिधी बोलत नाही. बीड जिल्ह्यात मध्यंतरी काही घटना झाल्या त्यावेळी येथील सत्ताधारी पक्षाचे एक आमदार दररोज प्रसार माध्यमासमोर येऊन भूमिका मांडत होते, आज ते गप्प आहेत. पंकजा मुंडे गप्प आहेत, त्यांनी मुख्यमंत्र्यांचा दबाव झुगारून बोलले पाहिजे. मुंबईतील एक सामाजिक कार्यकर्त्या अनेक विषयावर आक्रमक भूमिका घेत असतात त्यांनीही या विषयावर मौन बाळगलेले आहे. नारायण गड व भगवान गडाला आमचे साकडं आहे की त्यांनी या पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी पुढे यावे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी म्हटले आहे.

-------------

### चिखली येथील आई लक्ष्मीमाता मंदिर

धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे. ही मंजुरी मिळवून देण्यासाठी मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांनी घेतलेला पुढाकार अत्यंत उल्लेखनीय ठरला आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांना आज यश मिळाले असून, राज्य सरकार व आमदार सुरेश धस यांचे चिखली ग्रामस्थ, श्रद्धावंत भाविक आणि मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश धस प्रतिष्ठानच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

------------

### डॉ. मुंडे प्रकरणात बीडमध्ये टॉवरवर

''दोषींना तात्काळ अटक करा'' आणि ''गृहमंत्री राजीनामा द्या'' अशा घोषणांनी वातावरण दणाणून सोडलं. आंदोलनामुळे परिसरात मोठी गर्दी झाली होती. डॉ. मुंडे यांच्या अकस्मात मृत्यूमुळे स्थानिकांसह वैद्यकीय क्षेत्रातही हळहळ व्यक्त केली जात आहे. टॉवरवर चढलेल्या आंदोलकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या घटनेची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन डॉ. मुंडे यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. या टॉवर आंदोलनात मोहन आघाव, माऊली शिरसाट, केशव तांबडे , ढाकणे, आदी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आंदोलकांना शांत करण्याचा प्रयत्न केला, मात्र आंदोलकांनी ''न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार'' असा इशारा दिला. या आंदोलनामुळे भाजी मंडई परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून बंदोबस्त वाढवला. दरम्यान, बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, शहेनशहा सय्यद, सानप, इलियास शेख व इतर पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. टॉवर वर चढलेल्या आंदोलकांना खाली उतरण्यासाठी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या कडून विनंती करण्यात आली. मात्र आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. याशिवाय अग्निशमन घटनास्थळी तैनात करण्यात आले होते.

-----------------

### सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा

केला. मंत्री पंकजा मुंडे आणि गिरीश महाजन यांनी या तयारीचा आढाचा घेत विविध सूचना केल्या. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महाजन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समितीची आढावा बैठक मंत्रालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नाशिक कुंभमेळ्याचे नियोजन करताना तीन टप्प्यांवर नियोजन करावे असे यावेळी सूचित केले. तर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्य शासनाच्या वतीने २०० नवीन बसेस महामंडळास उपलब्ध व्हाव्यात, या बसेस कुंभमेळ्यानंतर राज्यात उपयोगी पडतील, असे यावेळी सांगितले. पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी नाशिक विमानतळ परिसरात देश-परदेशातून येणाऱ्या अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी विशेष सुविधा तसेच इतर ठिकाणी देखील अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी सुविधा उपलब्ध करण्यासाठी जागा निश्चिती करण्याचे सुचित केले.

----------

### राष्ट्रवादीचे मेहबूब शेख यांना निंबाळकरच्या

यांच्या कार्यकर्त्यांनी शिवीगाळ करत जीवे मारणे ची धमकी दिली या घटनेचे व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वायरल होत आहेत धमकी देणारा हा फलटण येथील निंबाळकर यांचा कार्यकर्ता होता तो तिकडून हरवत च्या भाषांमध्ये शेख मेहबूब यांना बोलत होता शेख महबूब यांना आई बहिणीवर शिव्या दिल्याचेही यावरून जाणवत होते एवढेच काय तर महबूब यांना जीवे मारण्याची धमकी देखील दिल्याचे या ऑडिओवरून दिसत आहे आता या प्रकरणाची ग्रह विभाग कशा पद्धतीने दखल घेत आहे याकडे लक्ष लागून आहे.

-------------

### दम असेल तर निवडणूक थांबवून

उच्च न्यायालयाने आझाद मैदानातच मोर्चा काढण्याचे निर्देश दिले असून, त्यापेक्षा दुसरीकडे मोर्चा काढता येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. राज ठाकरेंच्या 'मतदार यादी दुरुस्त होईपर्यंत निवडणुका थांबवा' या वक्तव्यावर सदावर्ते यांनी बोचरा पलटवार केला. निवडणूक लढण्याची ताकद नसल्याने हे नाटक सुरू आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, संजय राऊत हे दळभद्री उद्या मरणार म्हणून आज गोंधळ घालत आहेत, अशी खरमरीत टीका त्यांनी केली. उद्धव ठाकरे हा सुमार व्यंगचित्रकार आणि नालायक आहे. जरांगे पाटलांच्या वेळी न्यायालयाने ठिकाण निश्चित केलं होतं, तसंच याही वेळी नियम पाळले जातील. जास्त डुरडुर केली तर मुसक्या आवळल्या जातील, असा इशारा सदावर्ते यांनी दिला.

------------

# अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अनेक शेतकरी अद्यापही अनुदानापासून वंचित असून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणाऱ्या सरकार आणि प्रशासनाने नेमकी कोणाची दिवाळी गोड केली? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. प्रत्येकाचा फार्मर आयडी असतानाही त्यांचे अनुदान त्यांच्या खात्यात जमा होत नाही. नेमकं प्रशासनाचं चाललय काय? असा सवाल शेतकरी बांधवातून केला जात आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ३० ऑक्टोबर २०२५



# पदवीधर मतदार संघाच्या नोंदणीसाठी ६ नोव्हेंबरपर्यंत संधी

## कागदपत्राची तपासणी काटेकोरपणे होणार –पापळकर



**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी बीडसह संपूर्ण विभागातील पात्र पदवीधर मतदारांना आवाहन केले आहे की, विधान परिषद पदवीधर मतदार संघासाठी नाव नोंदणी प्रक्रिया सुरू असून अंतिम मुदत ६ नोव्हेंबर २०२५ जवळ आली आहे. त्यामुळे संबंधित मतदार संघ हद्दीत किमान ३ वर्षांचे वास्तव सिद्ध होते, अशा सुशिक्षित नागरिकांनी त्वरित अर्ज करणे आवश्यक आहे.**

जिल्हा स्तरावर या प्रक्रियेचे मार्गदर्शन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तर सतत आढावा उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव घेत आहेत.तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांच्या पुढाकारातून तहसील कार्यालयात मदत केंद्र सुरू करण्यात आले असून जनजागृतीसाठी ग्रामपातळीवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

पदवीधर मतदार संघ हा विशेषत: सुशिक्षित समाजाचा राजकारणातील सहभाग वाढवण्यासाठीची व्यवस्था आहे. विधान परिषदेमध्ये शिक्षण, कौशल्य विकास, युवा विषयक प्रश्न, अभ्यासकांचे अधिकार आणि सामाजिक प्रगतीशी निगडित मुद्दे मांडण्यासाठी पदवीधरांचे प्रतिनिधी निवडले जातात. त्यामुळे समाजातील सुशिक्षित घटकांचा आवाज थेट धोरणनिर्मितीपर्यंत पोहोचण्यास मदत होते.अर्जासाठी पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिका, आधार किंवा पॅन किंवा पासपोर्ट यापैकी ओळख पुरावा, विज बिल किंवा रेशनकार्ड किंवा भाडेकरार किंवा मालकी हक्क कागदपत्र असा राहत्या पत्त्याचा पुरावा आणि लागू असल्यास रोजगार किंवा व्यवसाय पुरावा आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती राजपत्रित अधिकारी अथवा महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा संस्थाप्रमुख यांनी करणे बंधनकारक आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की गठ्ठा पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. प्रत्येक अर्जदाराने स्वत:चा अर्ज स्वतंत्ररित्या सादर करावा. चुकीची माहिती किंवा अपूर्ण कागदपत्रांमुळे अर्ज नामंजूर केला जाईल आणि खोट्या कागदपत्रांवर कायदेशीर कारवाई होईल. अर्ज तपासणीदरम्यान मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.घरबसल्या नोंदणी करण्यासाठी निवडणूक विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध असून मोबाईल क्रमांक नोंदणी आणि एक वेळ संकेतसंख्या पडताळणी करून छायाचित्र, स्वाक्षरी आणि आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड केल्यावर अर्ज सादर करता येतो. डिजी लॉकरमधून कागदपत्रे मिळविण्याची सोयही उपलब्ध असल्याने नागरिकांना कार्यालयात वारंवार चकरा मारण्याची आवश्यकता नाही. बीड जिल्ह्यात सुमारे ५० हजार पात्र पदवीधर असण्याचा अंदाज असून अजूनही मोठ्या प्रमाणावर नाव नोंदणी बाकी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. महिलांसाठी आणि दिव्यांग मतदारांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विविध महाविद्यालयांनी माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवून अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन सुरू केले आहे.तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्याची सुविधा शासकीय सुट्टी वगळता दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ उपलब्ध आहे. अंतिम मुदत लक्षात घेऊन नागरिकांनी तात्काळ नोंदणी करावी, असे प्रशासनाचे आवाहन आहे.

स्वयंसेवक पथकांमार्फतही ग्रामीण भागात जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून घटनेने दिलेले कर्तव्य आहे. पदवीधरांनी एकही दिवस दवडू न देता तात्काळ नाव नोंदणी करावी. सुशिक्षित समाजाचा लोकशाहीतील सहभाग अधिक प्रभावीपणे वाढवणे ही सर्वांची जबाबदारी आहे.'

विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड

### उमेदवार स्वतः हजर असण्याचा आग्रह कशासाठी?–आंधळे



पदवीधर मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरताना उमेदवार स्वतः हजार असावा असा फतवा तहसील कार्यालयाने काढला आहे. मात्र सर्व कागदपत्र असतील तर हा अर्ज कोणीही भरू शकतो .त्यामुळे उमेदवार हजर असावा असे बंधनकारक नसतानाही तहसील कार्यालय मात्र उमेदवारांची आडवणूक करीत आहे. कोणीही आले तरी अर्ज स्वीकारावेत अशी मागणी प्रा. बबनराव आंधळे यांनी केली आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे –साबळे, मुंडे





वडवणी । प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, वडवणी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या इच्छुक उमेदवारांना महत्त्वाचे आवाहन करण्यात आले आहे. निवड समितीकडून प्राप्त माहितीनुसार, निवडणुकीत उमेदवारी दाखल करण्यास इच्छुक असलेल्या सर्व उमेदवारांनीआज मुलाखतीसाठी उपस्थित राहावे असे आव्हान, वडवणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बजरंग साबळे, व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून राज्यभरात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकीची संपूर्ण तयारी केली असून, सविस्तर प्रोग्रॅम डिक्लेअर केला आहे. त्या अनुषंगाने वडवणी तालुक्यातील सर्वच पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी व, इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत. आज दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट या पक्षाचे स्थानिक आमदार मा. प्रकाश दादा सोळंके, व जयसिंग भैय्या सोळंके यांच्यावतीने, वडवणी तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट व चार पंचायत समिती गणातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती, त्रिमूर्ती मंगल कार्यालय या ठिकाणी आज १० वाजता घेतल्या जाणार आहेत. तरीही तालुक्यातील इच्छुक उमेदवारांनी या मुलाखतीसाठी उपस्थित राहावे असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे त्याचबरोबर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे यांनी केले आहे. या मुलाखतीदरम्यान उमेदवारांचा शैक्षणिक व सामाजिक कार्याचा अनुभव, नेतृत्वगुण, जनसंपर्क, तसेच स्थानिक पातळीवरील योगदानाचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. समितीने स्पष्ट केले आहे. की या प्रक्रियेनंतरच अंतिम उमेदवारांची निवड करण्यात येईल. इच्छुक उमेदवारांनी आपली आवश्यक कागदपत्रे, ओळखपत्र,घेऊन मुलाखतीच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे.तसेच सर्व उमेदवारांना संधी दिली जाणार असून,या निवडणुकीत जबाबदार व सक्रिय उमेदवारांची निवड व्हावी हा मुख्य उद्देश असल्याचेही समितीच्या सूत्रांनी सांगितले.

# लोकसंचलित साधन केंद्राची वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि. १९ ऑक्टोबर २०२५रोजी औटी मंगल कार्यालय, जालना रोड, बीड येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसंचालित साधन केंद्र, बीड यांची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी. च्या अध्यक्षा कालिंदा दिनकर खांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. स्वागत प्रस्तावना तसेच वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवालाचे सादरीकरण व्यवस्थापक सविता सखाराम औटे यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आय.सी.आय.सी.आय. बँकेचे आर.एच.एस. संतोष पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी महिलांसाठी उपलब्ध विविध बँकिंग योजना, सूक्ष्म वित्त, बचत व गुंतवणुकीचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सभेस कृषी विभागाचे जाधवर कृषी विभाग आत्माचे सुरेश पाटील, सखी वन स्टॉप सेंटरच्या शांता खांडेकर, आय.सी.आय.सी.आय. बँकेचे नारायण बंडे, सी.एम.आर.सी. सचिव राजाभाऊ मस्के तसेच लोकसंचालित साधन केंद्राचे मानद सल्लागार व माविम जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप उपस्थित होते. तसेच सी.एम.आर.सी. पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व विविध बचत गट समूहांच्या महिला प्रतिनिधींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमात कृषी विभागाचे जाधवर यांनी महिला बचत गटांची कामगिरी, कृषी संबंधित योजना, पीकवाढ आणि कर्जसुविधांबाबत मार्गदर्शन केले. शांता खांडेकर यांनी महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांबद्दल मार्गदर्शन केले. कृषी विभाग आत्माचे सुरेश पाटील यांनी महिला उद्योजकतेस प्रोत्साहन देत बचत गट,उद्योग नोंदणी, कर्जसुविधा आणि कृषी व्यवसायातील सुधारणा याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचे सादरीकरण केले. कार्यक्रमात उत्कृष्ट उद्योजिका, उत्कृष्ट सहयोगिनी व उत्कृष्ट स्टाफ सदस्यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट महिला बचत गटांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी कार्यकारी मंडळ व स्टाफ यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कालिंदा दिनकर खांडे यांनी केले.या वार्षिक सभेमार्फत बचत गटाच्या महिलांनी आत्मनिर्भरतेचा संकल्प दृढ केला. महिलांच्या सामाजिक, आर्थिक व उद्योजकीय विकासासाठी माविम व लोकसंचालित साधन केंद्राचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सर्व उपस्थितांनी नमूद केले. या मेळाव्याने महिलांना प्रोत्साहन, प्रेरणा आणि सशक्ततेचा नवा आत्मविश्वास दिला.

पान ६ वरून...

## जिल्ह्यातील संत निरंकारी

भाविकांची अडचण सोडवली.यावेळी मान्यवरांनी रेल्वे चालक तसेच जाणाऱ्या सर्व भाविकांचे पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, विष्णू डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, इत्यादीसह शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बशीरगंज ते नगरपरिषदेपर्यंतच्या

त्या वेळी तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे यांना निवेदनही देण्यात आले होते. मात्र, सहा ते सात महिने उलटून गेले तरीही रस्त्यांची अवस्था जशीच्या तशी असून, नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवक मुग गिळून गप्प बसल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

## डॉ.संपदा मुंडे हत्या

कर्तबगारी समोर येऊ नये म्हणून तुला संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला ही अतिशय गंभीर बाब आहे या घटनेची योग्य प्रकारे दखल घेऊन शासनाने एस. आय. टी. चौकशी करून दोषीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी व डॉ.संपदा मुंडे व मुंडे कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी मागणी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी व पोलीस

आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम ११० सीआरपीसी अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही.सदर स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. अंबाजोगाई शहर व अंबाजोगाई ग्रामीण येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ६ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यातील पाच गुन्हे न्याप्रविष्ठ व एक गुन्हा तपासावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम ११० सीआरपीसी अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही. सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एमपीडीए कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर दोन्ही इसमास तात्काळ ताब्यात घेवून हार्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो.स्टे.प्रभारी अधिकारी अंबाजोगाई शहर व पो.नि.स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि.स्थागुशा शिवाजी बंटेवाड व पो.नि.शरद जोगदंड पो. स्टे. अंबाजोगाई शहर यांनी संयुक्त रित्या ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना दि.२८ ऑक्टोबर २०२५ रोजी ताब्यात घेऊन नमूद इसमांना हार्सूल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि.२९ ऑक्टोबर २०२५ रोजी ७.४५ वाजता हजर करुन स्थानबध्द केले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भापोसे), अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सपोअ अंबाजोगाई ऋषिकेश शिंदे, पोनि स्थागुशा शिवाजी बंटेवाड यांचे मागदर्शनाखाली पो.नि.शरद जोगदंड, पोअं श्रीकृष्ण वडकर, पोअं सुदर्शन गाडे, पोअं. दत्तात्रय इंगळे, पोअं. हनुमंत लाड, सपोउपनि अभिमन्यु औताडे, गोविंद भताने, रामचंद्र केकाण, विष्णु सानप, सचिन आंधळे व बिभिषण चव्हाण नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त एमपीडीए व मोक्का कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कोंवत (भापोसे) यांनी दिले आहेत. यामुळे बीड जिल्ह्यात विविध प्रकारचे अवैध धंदे चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अंबाजोगाईत केलेल्या कारवाईचे जनतेतून स्वागत होत आहे.

## आजपासून थोरल्या पाटांगणावर

या वार्षिक महोत्सवात दररोज चतुर्वेद पारायण होणार आहेच, तसेच चातुर्मासाच्या निमित्ताने नित्याचे काकड आरती, पंचामृतपूजा, अभिषेक इत्यादी उपक्रमासोबतच प्रत्येक एकादशी दिवशी गीतापाठ, दर चतुर्थीला अथर्वशीर्ष पाठ असे उपक्रमही पाटांगणावर सुरू असतात. या वर्षीचा हा ४२५ वा वार्षिक महोत्सव आणि त्यातील सप्ताहभर आयोजीत भरगच्च कार्यक्रमातून सर्व भाविक भक्तांनी, समस्त बीडकरांनी सहभागी व्हावे आणि भगवतभक्ती कृपाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे पदाधिकारी शिवसेना शिंदे गटात

## ग्रामीण भागात शिवसेनेची ताकद वाढू लागली



**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत बीड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) येथील काही पदाधिकाऱ्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख यांच्या उपस्थितीत बुधवारी झालेल्या कार्यक्रमात हा प्रवेश सोहळा संपन्न झाला.**

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेना जिल्हाध्यक्ष नागेश मिटे पाटील, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष दत्ताजी येवले, राष्ट्रवादी विद्यार्थी तालुकाध्यक्ष अभय भांडवलकर यांनी अधिकृतरित्या शिवसेना शिंदे गटात प्रवेश जाहीर केला. नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश सोहळ्यास शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके, माजी तालुकाप्रमुख प्रकाश नरनाळे पाटील, मुकेश महाजन, विक्रम भोसले यांच्यासह शिवसेना महिला आघाडीच्या शकुंतला घुंगाशे, चंद्रकला मुळे, नाटकर ताई, तसेच शिवराज उगले, अशोक गवते, गणेश पवार, स्वप्नील आबुज आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेशामुळे तालुक्यात शिवसेना शिंदे गटाला संघटनात्मक बळ मिळणार असल्याची प्रतिक्रिया शिवसैनिकातून व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या प्रोजेक्ट महादेवा योजनेसाठी निवड चाचणी

बीड । प्रतिनिधी

राज्यातील १३ वर्षाखालील मुला-मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दुरदर्शी नेतृत्वाखाली प्रोजेक्ट महादेवा ही योजना सुरू करण्यात आली आहे.

बीड येथे निवड चाचणी स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ०१ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीत खेळाडूचा जन्म झालेला असणे आवश्यक आहे. निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत होणार आहे. जिल्हास्तरावरी, विभागस्तरावरील व राज्यस्तरावरील निवड चाचणी होणार आहे. अंतिम टप्यात ६० मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि ६० मुलींची निवड डब्ल्युआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाणार आहे. यापैकी प्रत्येकी ३० मुला-मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना पाच वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाची समावेश असेल. निवड झालेल्या खेळाडूंना दिनांक १४ डिसेंबर रोजी मुंबई येणा-या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टॉर लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळणार आहे.

ही योजना मित्रा, क्रीडा विभाग, वायफा, सिडको आणि व्हीएसटीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. या योजनेचा राज्यातील फुटबॉल क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा उद्देश आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंनी निवड चाचण्यांपूर्वी नोंदणी दिनांक ३० ऑक्टोबरपर्यंत करणे आवश्यक आहे. सदर नोंदणीसाठी लिंक पुढील प्रमाणे आहे. :// ./ ६७६६०९२२६ सदर स्पर्धेची बीड साठी जिल्हास्तर निवड चाचणी दि. ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे सकाळी १०.०० वाजता आयोजित केली आहे.अधिकच्या माहितीसाठी क्रीडा अधिकारी कालिदास होसुरकर मो. नं.९५२१५९५५१५ व मोमीन मोसिन मो. नं. ९८६०१०१२६३ यांना संपर्क साधावा. जिल्हयातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सदर निवड चाचणी मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# समृद्धी कारखान्याच्या युनिट नंबर -२ 'घृष्णेश्वर' शुगर्सच्या गाळप हंगामास प्रारंभ

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव देण्याचा प्रयत्न करणार–महेंद्र मेठी



**जालना । प्रतिनिधी**

**समृद्धी साखर कारखान्याच्या युनिट नंबर-२ 'घृष्णेश्वर शुगर्स'च्या सातव्या गाळप हंगामाचा शुभारंभ खुलताबाद तालुक्याचे भूमिपुत्र तथा घृष्णेश्वर शुगर्सचे व्हाईस चेअरमन श्री महेंद्रजी मेठी यांच्या मातोश्री सौ. मीराताई रमेशराव मेठी व वडील श्री. रमेशदादा मेठी यांच्या शुभहस्ते झाला. यावेळी समृद्धी शुगर्सचे चेअरमन सतीश घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. खुलताबाद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी चांगला भाव देण्याचा प्रयत्न कारखाना करेल, असे कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी याप्रसंगी सांगितले.**

खुलताबाद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हक्काचा साखर कारखाना उभा करण्यासाठी तालुक्याचे भूमिपुत्र घृष्णेश्वर शुगर्सचे व्हाईस चेअरमन महेंद्रजी मेठी व समृद्धी शुगर्सचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून घृष्णेश्वर साखर कारखाना पुनरूज्जीवित झाला. बुधवारी घृष्णेश्वर शुगर्सचा सातवा बॉयलर अग्निप्रदीपन व मोळी पूजन सोहळा परिसरातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

घृष्णेश्वर साखर कारखाना खुलताबाद, फुलंब्री आणि कन्नड भागातील शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाहेरच्या कारखान्यांना ऊस न देता समृद्धीच्या युनिट नंबर-२ घृष्णेश्वर साखर कारखान्यावर विश्वास ठेवावा. असे आवाहन व्हाईस चेअरमन महेंद्रजी मेठी व चेअरमन सतीश घाटगे यांनी केले.

या शुभारंभ सोहळ्यास समृद्धी शुगर्सचे ज्येष्ठ संचालक सतीशराव चव्हाण, जितेंद्रजी मेठी, रमेश दादा घाटगे, प्रदीप घाटगे, मुख्य लेखापाल सुनील देसाई, लेखापाल रियाज शेख, प्रवीण काळे, शुगर सेल ऑफिसर प्रकाश देशमुख, देवनाथ जाधव, समृद्धीचे मुख्य शेतकी अधिकारी अमोल तौर यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

''खुलताबाद - फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी घृष्णेश्वर साखर कारखाना कटिबद्ध आहे. अनेक वर्षे शेतकऱ्याला बाहेरच्या कारखान्यांवर अवलंबून राहावे लागायचे. मिळेल त्या भावात ऊस द्यावा लागायचा. परंतु, आता ती वेळ त्यांच्यावर आम्ही येऊ देणार नाही. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव देण्याचा प्रयत्न घृष्णेश्वर साखर कारखाना करणार आहे.''

–महेंद्र मेठी,
व्हाईस चेअरमन, समृद्धी साखर कारखाना

**हा कारखाना उभा करण्यासाठी माजी मंत्री अशोक पाटील डोनगावकर साहेब यांचे आयुष्य गेले. हा कारखाना खुलताबाद तालुक्यातील भूमिपुत्राचा आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव देण्याबरोबरच ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या काळात सुधारित उसजातीचे बेणे पुरवून लागवडीसाठी शेतकी विभागाच्यामार्फत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न कारखाना करणार आहे.**

**–सतीश घाटगे,
चेअरमन, समृद्धी साखर कारखाना**

# कापूस खरेदीची प्रतीक्षा; शेतकऱ्यांना सीसीआयकडून न्यायाची अपेक्षा!

पुणे : हमीभावाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना सध्या व्यापाऱ्यांच्या दारातच मातीमोल भावात कापूस विकावा लागत आहे. शासनाच्या विलंबामुळे बाजारात अनिश्चितता वाढली असून शेतकरी सीसीआयकडून न्याय मिळण्याची अपेक्षा धरून आहेत.

यंदाच्या हंगामात पावसाने शेतकऱ्यांची मोठी वाताहत केली आहे. सोयाबीनचे उत्पादन घटले, तर कापसाची बोंडे सडली. आता कसाबसा कापूस वेचणीला आला असताना, शेतकरी तो मातीमोल भावाने व्यापाऱ्यांना विकण्यास भाग पाडले जात आहेत. दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्याने, त्यांनी व्यापाऱ्यांनी सांगितलेल्या दरात कापूस विकला. आता मात्र शेतकऱ्यांच्या नजरा भारतीय कापूस महामंडळाच्या खरेदीकडे लागल्या आहेत.

शासनाने यंदाच्या हंगामासाठी कापसाचा



हमीभाव जाहीर केला असला, तरी सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे अद्याप सुरू झालेली नाहीत. या विलंबाचा फायदा व्यापाऱ्यांनी उठवला आहे. शेतकऱ्यांकडून पडेल त्या भावात कापूस खरेदी सुरू आहे. सीसीआयने खरेदी सुरू केली नाही, त्यामुळे व्यापाऱ्यांच्या दारातच कापूस विकावा लागतो. दरम्यान दिवाळीसाठी घरखर्च भागवण्यासाठी मातीमोल भावात माल विकला असल्याचे शेतकरी सांगतात.

दुसरीकडे सततच्या पावसामुळे सोयाबीनचे उत्पादन घटले असून, व्यापाऱ्यांनी भाव ३ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत खाली आणले आहेत. कापूस बाजारात दररोज भावात चढ-उतार सुरू आहेत. राज्य आणि देशातील इतर बाजारपेठांतील भाव पाहून व्यापारी स्थानिक बाजारात बोली लावत आहेत. शासनाच्या हमीभावानुसार विक्री झाली तरी लागवडीचा खर्च निघत नाही. उलट तोटा सहन करावा लागत आहे. यामुळे शासनाने तत्काळ सीसीआय खरेदी केंद्रे सुरू करून हमीभावाने कापूस खरेदी करावी, अशी रास्त मागणी शेतकरी करीत आहेत. विलंब झाल्यास व्यापाऱ्यांकडून सुरू असलेली लूट वाढत जाईल आणि बळीराजा आर्थिक संकटात सापडेल. अशी परिस्थिती आहे.

## भरघोस उत्पादनासाठी हिरव्या मिरचीचे सुधारित वाण



शेतकरी बंधुंनो, तुम्ही जर खरीप हंगामात मिरची पिकाची लागवड करायच्या विचारात असाल तर मिरचीच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची माहिती असणे आवश्यक आहे.

पुसा ज्वाला : पुसा ज्वाला ही हिरव्या मिरचीच्या सर्वात प्रगत जातींपैकी एक आहे. मिरचीची ही जात कीड आणि कीटकांना प्रतिरोधक आहे. हिरव्या मिरचीच्या या जातीची लागवड करून शेतकरी सुमारे ३४ क्विंटल प्रति एकर उत्पादन मिळवू शकतात. हिरव्या मिरचीची ही जात पेरणीनंतर सुमारे १३० ते १५० दिवसांत पिकते. मिरचीच्या या जातीचा रंग हलका हिरवा असून त्याची झाडे कमी उंचीची आणि झुडूपासारखी असतात.

जवाहर मिर्च-१४८ : हिरवी जवाहर मिरची-१४८ या सुधारित जातीची जून महिन्यात लागवड करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. या जातीची मिरची सर्वात जलद पिकते आणि तिची चव कमी तिखट असते. मिरचीच्या या जातीच्या हिरव्या मिरचीचे प्रति हेक्टरी उत्पादन ८५ ते १०० क्विंटल एवढे मिळू शकते. जर ही मिरची वाळल्यावर तोडली तर हेक्टरी १८ ते २५ क्विंटल मिरचीचे उत्पादन मिळू शकते.

तेजस्विनी : हिरव्या मिरचीची तेजस्विनी जात लागवडीसाठी सर्वोत्तम मानली जाते. हिरव्या मिरचीच्या या जातीच्या शेंगा मध्यम आकाराच्या असतात आणि मिरचीची लांबी सुमारे १० सेंटीमीटरपर्यंत पोहोचते. पेरणीनंतर सुमारे ७० ते ७५ दिवसांनी शेतकरी या प्रकारच्या हिरव्या मिरचीची काढणी करू शकतात. तेजस्विनी जातीच्या हिरवी मिरचीची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन मिळू शकते.

पंजाब रेड : पंजाब रेड वाण ही हिरव्या मिरचीच्या सुधारित जातींपैकी एक आहे. तिच्या झाडाचा आकार लहान आहे आणि तिला गडद हिरवी पाने आहेत. या प्रकारच्या हिरव्या मिरचीचा आकारही फार मोठा नसतो. या जातीची लागवड करून शेतकर्यांना प्रति हेक्टरी १०० ते १२० क्विंटल हिरव्या मिरचीचे उत्पादन मिळू शकते. हिरव्या मिरचीच्या या प्रकारात तुम्हाला लाल रंगाच्या मिरच्या पाहायला मिळतात.

काशी अर्ली : काशी अर्ली या हिरव्या मिरचीच्या जातीपासून शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळते. या जातीची हिरवी मिरची एक हेक्टर मध्ये सुमारे ३०० ते ३५० क्विंटल उत्पादन देते. या जातीच्या मिरचीचे रोप सुमारे ७० ते ७५ सेमी उंच असून त्यांना लहान गाठी असतात. पेरणीनंतर सुमारे ४५ दिवसांत शेतकरी काशी अर्ली या हिरव्या मिरचीची कापणी करू शकतात.


## वांग्यावर कीड प्रादुर्भाव होण्यापुर्वीच करा हे उपाय

राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता अशा शेतकऱ्यांनी उन्हाळी वांगी लागवड केली आहे. मात्र, शेतकऱ्यांना वांग्याचे पीक घेताना, कीड प्रादुर्भावाचा सर्वाधिक सामना करावा लागतो. वांगी लागवड केल्यानंतर प्रामुख्याने शेतकऱ्यांना फळ आणि देठांना छिद्रे पडणाऱ्या अळीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. ज्यामुळे उत्पादनात घट होऊन, मोठा आर्थिक फटका सहन करावा लागतो. अशावेळी शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक कीटकनाशकांचा वापर करतात. मात्र, अशा वेळी शेतकऱ्यांनी फवारणी ऐवजी काही उपाय करणे आवश्यक असते.

अशी होते किडींची पैदास :सामान्यपणे जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात लागवड केल्यानंतर मार्च महिन्यात वांग्यावरील वयस्क मादी किडी ही दुधाळ रंगाची अंडी झाडाच्या पानाच्या खालच्या बाजूने घालते. ज्यामुळे देठ आणि फळे अधिक जवळ असतात. अशावेळी किडींची पैदास वाढीनंतर वांग्याच्या फळावर आणि आणि देठांवर आक्रमण करते. ज्यामुळे ऐन वाढीच्या व फुगवणीच्या अवस्थेत या किडीचा प्रादुर्भाव फळास होऊन, ती फळाला छिद्र पाडते. त्यानंतर प्रामुख्याने त्या छिद्रावाटे जिवाणू आणि बुरशीचा आता फळामध्ये प्रवेश होऊन, ते फळ सडण्यास सुरुवात होते. अशावेळी वांग्यावरील पूर्ण विकसित झालेली ही किडी प्रामुख्याने गुलाबी, भुऱ्या रंगाची असल्याचे पाहायला मिळते.

असे करा नियंत्रण : प्रामुख्याने शेतकऱ्यांनी वांगी लागवडीनंतर दोन आठवड्यांच्या आत फळधारणा होण्याच्या अगोदरपासून कामगंध सापळे लावण्याची व्यवस्था करावी. ज्यामुळे तुम्हाला कीटकनाशकांवरील खर्च कमी होउन, पिकांवरील प्रभावी कीड नियंत्रण करता येणार आहे. प्रामुख्याने प्रति एकर पिकासाठी कमीत कमी ४ ते ५ कामगंध सापळे लावावेत. गरज पडल्यास प्रति १० मीटर जागेत लावावे. शेतकऱ्यांनी किडींचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी त्याच त्याच जमिनीत पुन्हा पुन्हा वांग्याचे पीक घेण्याची चूक करू नये. शेतातील तण नियंत्रणावर विशेष भर द्यावा.

धने, सौफ यांची लागवड : विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी वांग्याचे पीक घेताना दोन वांग्याच्या बेडमधील जागेत धने किंवा सौफ यांची लागवड करावी. यामुळे कीड नियंत्रणास मोठी मदत होते. किड लागलेले शेंडे दिसून आल्यास अळीसकट नष्ट करावेत. ४० ग्रॅम कार्बारिल किंवा १४ मिली मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के किंवा २.४ मिली सायफरमेथिन, २५ टक्के १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा १० टक्के कार्बारिल भूकटी दर हेक्टरी २० किलो या प्रमाणात झाडांवर धुरळावी.



## उसावर दिसतोय पोक्का बोंग, तांबेराचा प्रादुर्भाव

प्रतिकूल हवामानामध्ये सध्याच्या काळात ऊस पिकामध्ये पोक्का बोंग, तांबेरा, गवताळ वाढ आणि यलो लिफ डिसीज या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगांची लक्षणे तपासून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

पोक्का बोंग : १) बुरशीचा प्रादुर्भाव झाल्यावर सुरुवातीला तिसऱ्या, चौथ्या पानांच्या बेचक्यात पांढरट, पिवळसर पट्टे दिसतात. रोगाचा प्राथमिक प्रसार हवा, पाण्याद्वारे होतो. २) सुरकुत्या पडून पाने आकसतात, लांबी घटते. तीव्रता वाढल्यास पाने सडतात. गळून पडतात किंवा एकमेकांत गुरफटतात. ३) कांड्यांवर कांडी काप (नाइफ कट) सारखी लक्षणे दिसून येतात. नियंत्रणाचे उपाय : माती परीक्षणानुसार योग्य प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. शेंडेकुज झालेले, पांगशा फुटलेले ऊस शेतातून वेगळे काढून जाळून नष्ट करावेत.

बुरशीनाशक फवारणी : (प्रति लिटर पाणी)

- २ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराइड किंवा
  - १ ग्रॅम कार्बेन्डाझिम किंवा
  - ३ ग्रॅम मॅम्कोझेब

टीप : १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. तपकिरी तांबेरा : वाढती आर्द्रता आणि तापमान रोगकारक बुरशीची वाढ आणि प्रसारासाठी पोषक असते. सुरुवातीस लहान व लांबट पिवळे ठिपके पानाच्या खालच्या बाजूस दिसून येतात. कालांतराने ठिपक्यांची लांबी वाढते. त्यांचा रंग लालसर तपकिरी किंवा तपकिरी दिसून येतो. ठिपक्यांचा भाग बुरशी आणि बीजाणूंच्या वाढीमुळे फुगीर होतो. त्यामुळे पानांचा ठिपक्यालगत भाग



फुटून त्यातून नारिंगी किंवा तांबूस-तपकिरी रंगाचे बीजाणू बाहेर पडतात.

रोगाचा प्रादुर्भाव आणि प्रसार पावसाळ्यानंतर ढगाळ वातावरण, जास्त आर्द्रता व थंड हवा असताना जास्त प्रमाणात दिसून येतो. रोगाचा प्रसार हवा, पाण्याद्वारे होतो.

नियंत्रणाचे उपाय : रोगाचा प्रादुर्भाव असणाऱ्या भागात मध्यम कोव्हीएसआय ०३१०२, व्हीएसआय ०८००५ या रोग प्रतिकारक जातींची लागवड करावी.

खतांची मात्रा माती परीक्षणानुसार योग्य वेळी द्यावी. नत्रयुक्त खते तसेच इतर खतांची मात्रा उशिरा देऊ नये. पावसाळ्यात शेतातून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

बुरशीनाशकाची फवारणी : (प्रति लिटर पाणी)

- प्रोपिनेब २.५ ग्रॅम किंवा
- मॅम्कोझेब ३ ग्रॅम

टीप : १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. रोगाचा जास्त प्रादुर्भाव असेल तर फवारणीपूर्वी रोगग्रस्त आणि वाळलेली पाने शेताबाहेर काढावीत.

गवताळ वाढ : दूषित बेणे आणि मावा, तुडतुडे किडीद्वारे प्रसार होतो. सुरुवातीच्या काळात बेटात प्रमाणापेक्षा जास्त फुटवे दिसतात. बेटास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. पानांमध्ये हरितद्रव्य कमी प्रमाणात तयार होते. पाने पिवळी, पांढरी पडतात. पाने अरुंद व आखूड होतात. पूर्ण वाढ झालेल्या उसामध्ये पोंग्यातील पाने पिवळी पडतात. कांड्यावरील डोळ्यातून पिवळसर पांगशा फुटतात. रोगट ऊस पोकळ पडून वाळतो. खोडवा पिकात रोगाचे प्रमाण सुरुवातीच्या काळात जास्त आढळते.

नियंत्रणाचे उपाय : रोगमुक्त बेणे लागणीसाठी निवडावे. १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम १०० लिटर पाण्यात मिसळावे. या द्रावणात बेणे १५ मिनिटे बुडवून त्यानंतर लागवडीसाठी वापरावे. पिकाची पाहणी करून रोगट बेटे काढून जाळून नष्ट करावीत. रोगाचा प्रसार करणाऱ्या मावा, तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी ०.३ मिलि इमिडाक्लोप्रीड प्रति लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

येलो लिफ डिसीज : हा विषाणूजन्य रोग आहे. बेण्याद्वारे देखील हा रोग पसरतो. खोडवा पिकात जास्त प्रमाण आढळते. ७ ते ८ महिन्यांच्या पिकांमध्ये सुरुवातीस पानाची मध्यशीर खालच्या बाजूने पिवळी पडते. प्रथम ३ ते ६ क्रमांकाच्या पानांवर लक्षणे दिसतात. कालांतराने पिवळेपणा मध्यशिरेपासून बाजूस वाढत जाऊन पूर्ण पान पिवळे पडते. हळूहळू उसाची सर्व पाने पिवळी पडतात. शेंड्याकडून पाने वाळत जातात. काही वेळेस रोगग्रस्त पाने शिरेलगत लालसर दिसतात. किडींचा प्रादुर्भाव, अतिथंडी तसेच अन्नद्रव्यांच्या ताणामुळे रोगाची तीव्रता दिसते.

नियंत्रणाचे उपाय : बेणे बदलासाठी तीन स्तरीय बेणेमळा करावा. पायाभूत बेणेमळ्यासाठी जास्तीत जास्त उतिसंवर्धित रोपांचा वापर करावा. पीक ताणग्रस्त राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोगाचा प्रसार करणाऱ्या मावा, तुडतुडे, पांढरी माशी या किडींच्या नियंत्रणासाठी ०.३ मिलि इमिडाक्लोप्रीड प्रति लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### जागतिक बचत दिन

### महत्वाच्या घटना

१९२० : सिडनी येथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ ऑस्ट्रेलियाची स्थापना.
१९२८ : लाहोर येथे सायमन कमिशनचा निषेध करणार्या लाला लजपतराय यांच्यावर ब्रिटिश पोलिसांनी लाठीहल्ला केला. त्यातच पुढे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचा अंत झाला.
१९४५ : भारताला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्त्व मिळाले.
१९६० : ब्रिटन मध्ये पहिल्यांदा किडनीचे प्रत्यारोपण करण्यात आले.
१९६६ : शिवाजी पार्कवर शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा झाला.
१९७३ : इस्तंबुलमधील बॉस्पोरस पूल पूर्ण झाल्यामुळे युरोप आणि आशिया जोडले गेले.
१९९५ : कॅनडातील क्वेबेक प्रांताने विभक्त होण्यासाठी घेतलेल्या सार्वमतात जनतेने ५०.६% विरुद्ध ४९.४% मतांनी कॅनडातच राहण्याचा निर्णय दिला.
२०१३ : सचिन तेंडुलकर आपल्या कारकिर्दीतील शेवटचा रणजी सामना खेळला. हरयाणाविरुद्ध झालेल्या या सामन्यात सचिनने विजयी फटका मारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३५ : जॉन ॲडॅम्स अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ४ जुलै १८२६)
१८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रशासकीय अधिकारी व राष्ट्रवादी तसचं, भारतीय क्रांतिकारक संस्था अनुशीलन समितीचे प्रारंभिक सदस्य प्रमथनाथ मित्र यांचा जन्मदिन.
१८८७ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (मृत्यू: १० सप्टेंबर १९२३)
१९०९ : डॉ. होमी जहांगीर भाभा भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २४ जानेवारी १९६६)
१९२१ : मध्य प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक राजकारणी भाई महावीर यांचा जन्मदिन.
१९३२ : भारतीय इतिहासकार आणि लेखक बरुन डी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जुलै २०१३)
१९४९ : प्रमोद महाजन केन्द्रीय मंत्री व राज्यसभा खासदार (मृत्यू: ३ मे २००६)
१९५१ : भारतीय ड्रमर आणि गीतकार त्रिलोक गुर्टू यांचा जन्म.
१९६० : डिएगो मॅराडोना अर्जेंटिनाचा फूटबॉलपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि विद्वान दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८२४)
१९७४ : बेगम अख्तर गझल, दादरा आणि ठुमरी गायिका. गझल गायकीला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. (जन्म: ७ आक्टोबर १९१४)
१९८४ : प्रसिद्ध चित्रपट निर्माता, लेखक, दिग्दर्शक आणि संगीतकार ख्वाजा खुर्शीद अन्वर यांचे निधन.
१९९० : व्ही. शांताराम चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (जन्म: १८ नोव्हेंबर १९०१)
१९९० : विनोद मेहरा अभिनेता (जन्म: १३ फेब्रुवारी १९४५)
१९९४ : सरदार स्वर्ण सिंग केन्द्रीय मंत्री (जन्म: १९ ऑगस्ट १९०७)
१९९६ : प्रभाकर नारायण ऊर्फ 'भाऊ' पाध्ये लेखक, पत्रकार व कामगार संघटनेचे कार्यकर्ते (जन्म: २९ नोव्हेंबर १९२६)
१९९८ : विश्राम बेडेकर लेखक व दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १९०६)
२००५ : भारतीय राजकारणी शम्मीशेर सिंह शेरी यांचे निधन.
२०११ : अरविंद मफतलाल उद्योगपती (जन्म: २७ आक्टोबर १९२३)
२०१४ : सुप्रसिद्ध भारतीय साहित्यकार रॉबिन शॉ यांचे निधन.

## कांदेबाग केळीचे सरासरी उत्पादन घटले

जळगाव : खानदेशात मार्च ते जून या कालावधीत विविध भागांत वादळामुळे कांदेबाग केळी पिकाची मोठी हानी झाली. यात पीक निसवणीवर असतानाही कमी पाऊस होता. याचा फटका पिकास बसला आहे. यामुळे उत्पादन कमी झाले असून कांदेबाग केळीची सरासरी रास १५ किलोपर्यंत जिल्ह्यात दिसत आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कांदेबाग केळी पिकाची निसवण व अन्य व्यवस्थापन भर उन्हाळ्यात करावे लागते. कारण त्याची लागवड ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये होते. आगाप लागवड सप्टेंबरमध्ये असते. उष्णतेचे चार महिने व याच कालावधीमधील वादळ व अन्य समस्यांचा फटका या बागांना बसला आहे. बागांची निसवण व काढणीची प्रक्रिया पावसाळ्यात सुरू होते. परंतु या बागांना यंदा वादळाचा मोठा फटका बसला आहे. एप्रिल व मे महिन्यात जळगाव, चोपडा, यावल या भागांत वादळी पाऊस झाला. यात पिकाचे नुकसान झाले. अनेक बागांची पाने फाटली. यामुळे बागांच्या वाढीवर परिणाम



झाला. यात यंदा फेब्रुवारीतच सरासरी तापमान अधिक होते. मार्च व एप्रिलमध्येही तापमान अधिक होते. पुरेसे पाणी देऊनही कांदेबाग केळी होरपळल्याचे प्रकार जामनेर, जळगाव भागांत घडले. बागांची पाने फाटल्याने पिकाची अन्नग्रहण क्षमता पूर्ण खालावली. खानदेशात एप्रिलमध्ये केळी पिकासाठी प्रतिकूल वातावरण राहिले. पण मेमध्ये कमाल तापमान कमी होते. यामुळे काहीसा दिलासा मिळाला. पण पिकात निसवणीला फटका बसला. कमी फण्या व दर्जा यावरही परिणाम झाला. यामुळे कमाल २० ते १८ किलोची रास शेतकरी मिळवू शकले आहेत. काही भागात १० ते १२ किलो उत्पादन राहिले. सरासरी उत्पादन मागील हंगामाच्या तुलनेत दीड ते दोन किलोने कमी झाले आहे.

# स्वराज्य निवडणूकीच्या अनुषंगाने सर्वांनी कायद्याचे पालन करावे -जिल्हाधिकारी



जालना । प्रतिनिधी

आगामी कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक प्रक्रीया पार पडणार असुन, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली त्यावेळी श्रीमती मित्तल या बोलत होत्या. यावेळी बैठकीस पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, प्रभारी अपर उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, येणाऱ्या कालावधीत स्वराजय संस्थेच्या निवडणूक होणार आहे. याकरीता जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात शांततेसाठी आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न्? उद्भवणार नाही यासाठी पूर्व नियोजन करावे. तसेच सदर कालावधीत जिल्ह्यात व्यवस्थित बंदोबस्त ठेवण्यात यावा. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन व संभाव्य कायदा सुव्यवस्था प्रश्नांवर उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यात कुठेही कोणताही अनुचित प्रकार किंवा गुन्हेगारी घटना घडू नये यासाठी दक्षता घ्यावी. गुन्हेगाराविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५, ५६ व ५७ अन्वये तातडीने कारवाई होण्याचे अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी समन्ववय साधुन प्रकरण दाखल झालेपासुन एक महिन्यात निकाली काढावेत. तसेच तात्काळ प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. हद्दपार इसम आदेशाचे पालन करत असल्याचे पोलीस विभागाने वेळोवेळी तपासणी करावी. प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रकरणे चालविण्याकरीता दिवस व वेळ निश्चित करुन प्रकरणे निकाली काढावीत. जेणेकरुन तातडीने प्रकरणे निकाली निघतील. गुन्हेगाराविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाइचे अनुषगाने तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याकरीता पोलीस विभागाने आवश्यक तपासणी करुन कायद्यांतर्गत स्थानबध्दतेकरीता प्रस्ताव सादर करावेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२६, १२७, १२८, १२९ अन्वये पोलीस विभागाकडून करण्यात प्रतिबंधात्मक कारवाई मध्ये प्रकरणपरत्वे, अंतिम बंधपत्र घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी असुन, अंतीम बंधपत्र घेणे. तसेच बंधपत्राचे पालन होत असल्याची बाब पोलीस विभागाने तपासणी करावी. यासाठी संबंधित पोलीस निरीक्षक व कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी वेळोवेळी एकत्रित बैठक आयोजीत करुन बैठकीत आढावा घ्यावा. तसेच अवैध मद्य विक्री होणार नाही याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाने पथक स्थापन करुन सदर पथकामार्फत रात्रवेळी गस्त तसेच तपासणी करुन अवैध मद्य विक्री विरोधात कारवाई करावी. शहरातील तसेच पुर्ण जिल्ह्यातील गुन्हेगारी वाढणार नाही, याकरीता सर्व यंत्रणामध्ये समन्वय ठेवून वेळोवेळी कारवाई करावी. सोशल मिडिया व इतर माध्यमांतून अफवा फैलवणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जेणेकरुन सदरील पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करता येईल. तसेच नागरिकांनी देखील सहकार्य करून शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

यावेळी पोलीस अधिक्षक बंसल म्हणाले की, आगामी काळात पार पडणाऱ्या निवडणूक वेळी जिल्ह्यात शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याच्या अनुषंगाने पोलिस विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच भरारी पथके, चेकपोस्ट आणि तक्रार निवारण केंद्र ठिकाणी ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार होणार नाही, तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागामार्फत योग्य नियोजन करण्यात आले आहे. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार यांची उपस्थिती होती.

# मिरची व्यापाऱ्याची मिरची चोरी करणारे आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना । प्रतिनिधी

पोलीस ठाणे चंदनझिरा येथे नवा मोंढा जालना येथील मिरचीच्या दुकानातुन ७० किलो अंदाजे वजनाचे १५,४००/- रुपयाचे दोन लाल रंगाचे मिरची भरलेले भोत अज्ञात इसमांनी चोरुन नेले वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे चंदनझिरा जालना गुरनं. ५५९/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. प्रमाणे दाखल झाला होता.

सदर गुन्हा उघडकीस करणे बाबत मा. पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांनी सुचना दिल्या होत्या, त्यावरुन सदर गुन्हयातील आरोपीतां बाबत माहिती घेत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली होती की, सदरचा गुन्हा हा शेख शोएब ऊर्फ शेरु शेख गफार वय २२ वर्ष रा.लालबाग जालना २) शहारुख सैयद इब्राहीम वय २७ वर्ष रा.लालबाग जालना जि. जालना यांनी केला आहे. मिळालेल्या माहिती वरुन आरोपीतांचा शोध घेतला असता ते मिळुन आल्याने व त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांचे कडुन १५,४००/- रुपयाचे दोन लाल मिरच्या भरलेले मोठे भोत प्रत्येकी ३५ किलोग्राम प्रमाणे ७० किलो वजनाचे जप्त करण्यात आले असुन गुन्हा करतांना वापरलेली ८०,०००/- होंडा शाईन कंपनीची मोटार सायकल असे एकूण ९५,४००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपी शेख शोएब ऊर्फ शेरु शेख गफार हा पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथुन एक वर्षासाठी हद्दपार असून त्याचे वास्तव्य जालना येथे असले बाबत दिसुन आल्याने त्याचे विरुद्ध कार्यवाही करण्यात आली आहे. सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब व अप्पर पोलीस अधिक्षक साहेब जालना श्री आयुष नोपानी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, यांच्या पथकाने कारवाई केली.

# जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक सत्संगाकरिता दिल्लीस रवाना



जालना । प्रतिनिधी

दिल्ली येथे होणाऱ्या समागम सत्संग - २०२५ या भव्य आध्यात्मिक सोहळ्यासाठी जालना जिल्ह्यासह नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनेक संत निरंकारी भाविक आज दि.२९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या सत्संगाकरिता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून मागील तीन वर्षापूर्वी सुरु करण्यात आलेल्या नांदेड ते पानिपत या विशेष रेल्वे गाडीने आज रवाना झाले. जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक जालना रेल्वे स्थानकावरून या विशेष रेल्वेने सर्व जन रवाना होत असताना भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, बाबासाहेब भोजने ,जालना जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे, नगरसेविका सौ. संध्याताई देठे, कपिल दहेकर यांच्या उपस्थितीमध्ये या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला व सकाळी ११.३० वा हि रेल्वे गाडी जालना रेल्वे स्थानकावरून पुढील प्रवासाकरिता रवाना झाली.

यावेळी बोलताना शुभेच्छा पर बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, या जिल्ह्याचे लोकनेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे रेल्वे राज्यमंत्री असताना जालना जिल्ह्याला अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून दिल्या ज्यामध्ये जनशताब्दी एक्स्प्रेस, वंदेभारत एक्स्प्रेस, ओखा एक्स्प्रेस, छपरा एक्स्प्रेस इत्यादी गाड्यासह अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून जालना जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, तीर्थयात्री इत्यादीसह जनतेची होणारी प्रवासाची गैरसोय दूर केली. ते बघून मागील तीन वर्षापासून जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक उत्तर भारतात होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यासाठी जातात त्यासाठी त्यांनी दानवे साहेबाना विनंती करून विशेष रेल्वे गाडीची मागणी केली होती दानवे साहेबांनी स्वत: प्रयत्न करून या भाविकांची अडचण दूर करण्यासाठी अध्यात्मिक सोहळ्यासाठी नांदेड ते पानिपत हि विशेष गाडी सुरु करून भाविकांची अडचण सोडवली. यावेळी मान्यवरांनी रेल्वे चालक तसेच जाणाऱ्या सर्व भाविकांचे पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, विष्णू डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, इत्यादीसह शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नोकरीचे आमिष दाखवून तरुणीला थायलंडमध्ये विकले

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

थायलंडमध्ये उच्च पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून शहरातील २९ वर्षीय घटस्फोटीत तरुणीला चॅटिंग स्कॅम करणाऱ्या कंपनीत विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कंपनीत जबरदस्तीने फसवणुकीचे काम करवून घेण्यात आले. दोन महिन्यांनंतर तिने स्वतःची सुटका करण्यासाठी मोठी रक्कम भरली. भारतात परत आल्यानंतर तिला मुंबई येथील सहार पोलिस ठाण्यात इमिग्रेशन अधिकारी घेऊन गेले. तिथे तिने तक्रार दिल्यानंतर आरोपी अविनाश रामभाऊ उढाण याच्याविरुद्ध गुन्हा नोंद होऊन पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा वर्ग करण्यात आला.

तक्रारीनुसार, २९ वर्षीय तरुणी घटस्फोटानंतर नोकरीच्या शोधात शहरात आली होती. वृत्तपत्रातील जाहिरातीवरून तिची नियुक्ती एफ व्होल्ट या कंपनीत झाली. ही कंपनी शंकरा रेसिडन्सी, उल्कानगरी रोड, गारखेडा येथे कार्यरत आहे आणि तिचा मालक अविनाश रामभाऊ उढाण असा आहे. अविनाश याने महिलेशी ओळख वाढवून थायलंडमध्ये मार्केटिंग मॅनेजर म्हणून उच्च पगाराची नोकरी असल्याचे सांगितले. त्यासाठी त्याने दीड लाख रुपये घेतले, आणि नोकरी निश्चित झाल्याचे सांगून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात दिल्ली विमानतळावरून तिला थायलंडला रवाना केले. महिला बँकॉक विमानतळावर पोहोचताच हरपीत सिंग नामक व्यक्तीने तिला रिसीव्ह करून कंम्पोट (कंबोडिया) येथील क्रिएटिव्ह माईंडसेट नावाच्या कंपनीत नेले. तेथे महिलेला स्कॅमींगचे काम दिले गेले. म्हणजेच बनावट ऑनलाइन चॅटिंग, ग्राहकांची दिशाभूल व डिजिटल फसवणुकीसाठी संदेश पाठवणे. काही दिवसांतच तिला कळले की अविनाश उढाण यांनीच तिला चॅटिंग स्कॅम रॅकेटला विक्री केले आहे. महिलेला या ठिकाणी जवळपास दोन महिने अडकवून ठेवण्यात आले. नंतर तिने २,००० यूएस डॉलर भरून स्वतःची सुटका केली. कंबोडियातील भारतीय दूतावासाच्या मदतीने ती २१ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई विमानतळावर परत आली. तेथे इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी चौकशी केली. तेव्हा तिने पूर्वकल्पना न देता उढाण याने तिला चॅटिंग स्कॅमच्या कामासाठी थायलंड येथे पाठवले असल्याचे सांगितले.

## जवळाबाजार येथील कृषी विकी केंद्र धारकांचे एकदिवसीय दुकानबंद आंदोलन

हिंगोली। प्रतिनिधी

राज्यातील कृषि विक्री केंद्र धारकांनी कृषी विभागाच्या धोरणांविरोधात एकदिवसीय दुकानबंद आंदोलन छेडले. कृषी विभागाकडून विविध जाचक अटी लादण्यात आल्याने शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक माल खरेदी करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे या अटी तत्काळ रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी विक्रेत्यांनी केली आहे.राज्याच्या कृषी विभागाने मागील वर्षभरात बियाण्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत नियंत्रण ठेवण्यासाठी नवे पोर्टल प्रणाली लागू केली आहे. यामध्ये कंपन्या आणि घाऊक विक्रेत्यांसाठी 'पोर्टल १' आणि किरकोळ विक्रेत्यांसाठी 'साथा पोर्टल २' वापरण्याचे धोरण अंमलात आणण्यात आले आहे. मात्र, 'साथा पोर्टल २' च्या अंमलबजावणीमुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असून, शेतकऱ्यांना पेरणीसाठी लागणारा माल उशिराने मिळत आहे. या पार्श्वभूमीवर २८ ऑक्टोबररोजी राज्यभरातील सर्व कृषी विक्री केंद्र धारकांनी आपली दुकाने एक दिवस बंद ठेवून निषेध नोंदविला. जवळाबाजार येथील कृषी केंद्रांनीही सकाळपासून दुकान बंद ठेवून 'साथा पोर्टल २' स्थगित करण्यात यावे, अशी ठाम मागणी केली आहे.

## स्ट्रीट लाईट दुरुस्त करताना विजेचा धक्क्याने नगरपरिषद कर्मचाऱ्याचा मृत्यू

मानवत । प्रतिनिधी

मानवत शहरातील पाळोदी रोड भागात स्ट्रीट लाईट दुरुस्ती करताना नगरपालिकेच्या एका कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. प्रदीप रामभाऊ सोनटक्के (वय ३९) रा. नगर पालिका वसाहत असे त्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

पालिकेचे सफाई विभाग अधिकारी रावसाहेब दगडू झोडपे (रा. वालीबाचा मळा, मानवत) यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रदीप सोनटक्के हे नगर परिषदेच्या स्ट्रीट लाईट विभागात मागील ३५ वर्षापासून कार्यरत आहेत. सोमवारी सकाळी प्रदीप सोनटक्के, सिद्धांत घुगे, लाखनसिंग जुन्नी व दत्ता उन्हाळे या सहकाऱ्यांसह पथदिवे दुरुस्तीचे काम करण्यास गेले होते. काम सुरू करण्यापूर्वी जुनी रचना कॉलनी डी.पी. बंद करून लाईट दुरुस्तीचे काम सुरू केले होते. पहिल्या दोन पोलवरील काम पूर्ण झाल्यानंतर प्रदीप सोनटक्के तिसऱ्या पोलवर चढून काम करीत असताना त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला आणि ते खाली पडले. तत्काळ सहकाऱ्यांनी त्यांना एका खाजगी रुग्णालयात , मानवत येथे दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह ग्रामिण रुग्णालय मानवत येथे शवविच्छेदनासाठी हलविण्यात आला. रावसाहेब झोडपे यांनी दिलेल्या खबरीनुसार, ही घटना अपघाती असून कोणावरही संशय नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.या नुसार मानवत पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास मानवत पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांत हळहळ व्यक्त केली जात आहे.

# समृद्धी कारखान्याच्या युनिट नंबर -२ घृष्णेश्वर शुगर्सच्या गाळप हंगामास प्रारंभ

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव देण्याचा प्रयत्न करणार



जालना । प्रतिनिधी

समृद्धी साखर कारखान्याच्या युनिट नंबर-२ 'घृष्णेश्वर शुगर्स'च्या सातव्या गाळप हंगामाचा शुभारंभ खुलताबाद तालुक्याचे भूमिपुत्र तथा घृष्णेश्वर शुगर्सचे व्हाईस चेअरमन श्री महेंद्रजी मेठी यांच्या मातोश्री सौ. मीराताई रमेशराव मेठी व वडील श्री. रमेशदादा मेठी यांच्या शुभहस्ते झाला. यावेळी समृद्धी शुगर्सचे चेअरमन सतीश घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. खुलताबाद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी चांगला भाव देण्याचा प्रयत्न कारखाना करेल, असे कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी याप्रसंगी सांगितले. खुलताबाद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हक्काचा साखर कारखाना उभा करण्यासाठी तालुक्याचे भूमिपुत्र घृष्णेश्वर शुगर्सचे व्हाईस चेअरमन महेंद्रजी मेठी व समृद्धी शुगर्सचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून घृष्णेश्वर साखर कारखाना पुनरूज्जीवित झाला. बुधवारी घृष्णेश्वर शुगर्सचा सातवा बॉयलर अग्निप्रदीपन व मोळी पूजन सोहळा परिसरातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

घृष्णेश्वर साखर कारखाना खुलताबाद, फुलंब्री आणि कन्नड भागातील शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाहेरच्या कारखान्यांना ऊस न देता समृद्धीच्या युनिट नंबर-२ घृष्णेश्वर साखर कारखान्यावर विश्वास ठेवावा. असे आवाहन व्हाईस चेअरमन महेंद्रजी मेठी व चेअरमन सतीश घाटगे यांनी केले. या शुभारंभ सोहळ्यास समृद्धी शुगर्सचे ज्येष्ठ संचालक सतीशराव चव्हाण, जितेंद्रजी मेठी, रमेश दादा घाटगे, प्रदीप घाटगे, मुख्य लेखापाल सुनील देसाई, लेखापाल रियाज शेख, प्रवीण काळे, शुगर सेल ऑफिसर प्रकाश देशमुख, देवनाथ जाधव, समृद्धीचे मुख्य शेतकी अधिकारी अमोल तौर यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

''खुलताबाद - फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी घृष्णेश्वर साखर कारखाना कटिबद्ध आहे. अनेक वर्षे शेतकऱ्याला बाहेरच्या कारखान्यांवर अवलंबून राहावे लागायचे. मिळेल त्या भावात ऊस द्यावा लागायचा. परंतु, आता ती वेळ त्यांच्यावर आम्ही येऊ देणार नाही. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव देण्याचा प्रयत्न घृष्णेश्वर साखर कारखाना करणार आहे.''

-महेंद्र मेठी, व्हाईस चेअरमन

हा कारखाना उभा करण्यासाठी माजी मंत्री अशोक पाटील डोनगावकर साहेब यांचे आयुष्य गेले. हा कारखाना खुलताबाद तालुक्यातील भूमिपुत्राचा आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव देण्याबरोबरच ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या काळात सुधारित उसजातीचे बेणे पुरवून लागवडीसाठी शेतकी विभागाच्यामार्फत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न कारखाना करणार आहे.

-सतीश घाटगे, चेअरमन

# विळेगावात धाडसी घरफोडी; २५ तोळे सोन्याचे दागिने लंपास



देवणी । प्रतिनिधी

विळेगाव (ता. देवणी) येथे धाडसी घरफोडी झाली असून चोरट्यांनी तब्बल २५ तोळे सोन्याचे दागिने चोरल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना दि. २७ ते २८ च्या मध्यरात्री घडली. एका शेतकऱ्याच्या घरातून तब्बल ९ लाख ९८ हजार ७०१ रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घरफोडी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

किशन विठ्ठलराव पाटील (वय ७२, रा. विळेगाव, ता. देवणी) यांनी देवणी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २७ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता ते २८ ऑक्टोबर रोजी पहाटे २ या वेळेत त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. कपाट तोडून व लेन्टनवरील बॅग फाडून त्यातील सोन्याचे दागिने चोरीस नेले. घरात कोणी नसल्याने चोरट्याने संधी साधली. एकूण २४ तोळे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ज्यात विविध अंगठ्या, झुमके, बोरमाळ, नेकलेस, पवळे हार, गोपला, लाकेट, मिनी गंठण, इत्यादींचा समावेश असून त्यांची एकूण किंमत ९ लाख ९८ हजार ७०१ इतकी आहे. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर विळेगाव परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांकडून रात्री गस्त वाढविण्यात आली असून, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन व संशयितांची चौकशी सुरू आहे.

# आ.धस यांच्या प्रयत्नाने ५८ कोटींच्या विकासकामांना मंजुरी

## मुख्यमंत्री फडवणीस यांचे आष्टी मतदारसंघाला झुकते माप; जलसंपदा, नगरविकास, पर्यटन, ग्रामविकास व सामाजिक न्याय विभागांतर्गत कामांचा समावेश

आष्टी । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आष्टी विधानसभा मतदारसंघाला तब्बल ५८ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची मंजुरी मिळाली आहे. जलसंपदा, नगरविकास, पर्यटन, ग्रामविकास, सामाजिक न्याय आणि बहुजन कल्याण विभागांतर्गत विविध योजना राबवण्यात येणार असून, ग्रामीण आणि शहरी भागाच्या सर्वांगीण विकासाला यामुळे चालना मिळणार आहे.


जलसंपदा विभाग अंतर्गत शिरूर (का.) तालुक्यातील मौजे ब्रम्हनाथ येळंब आणि निमगाव बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतरण अनुक्रमे १७ कोटी ३० लाख व २२ कोटी ८ लाख खर्चाने करण्यात येणार आहे. या सुधारणा कामांमुळे शेकडो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, जलसाठा नियोजन आणि पाणीसाठा व्यवस्थापन अधिक सक्षम होणार आहे.

नगरविकास विभाग अंतर्गत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) नगरपंचायतींसाठी एकूण १० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. यात नागरी सुविधा, सिमेंट रस्ते, नाली, पूल, अंगणवाडी बांधकाम, तसेच 'वैशिष्ट्यपूर्ण योजनेतर्गत सार्वजनिक अभ्यासिका, स्मशानभूमी सुधारणा, क्रीडा हॉल, क्रीडांगण विकास आदी कामांचा समावेश आहे. या कामांमुळे शहरांच्या सौंदर्यीकरणासोबतच सार्वजनिक सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे.

प्रादेशिक पर्यटन विकास योजना (२०२५-२६)

या योजनेतून मतदारसंघातील चार धार्मिक स्थळांना एकूण २ कोटी रुपये निधी मंजूर झाला





आहे.यामध्ये माऊली मंदिर, मुर्शदपूर ५० लाख,लक्ष्मी माता मंदिर,चिखली ५० लाख,श्री भैरवनाथ मंदिर, वाळुंज ५० लाख,श्री क्षेत्र राजे धर्माजी गड, हातोला ५० लाख या कामांतून सभागृह, भक्तनिवास, सिमेंट रस्ते आणि अन्नछत्रालय उभारले जाणार असून पर्यटनास चालना मिळेल.

ग्रामविकास विभाग अंतर्गत लेखाशीर्षक २५१५ अंतर्गत २ कोटी ५० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. सिमेंट रस्ते, नळकांडी पूल, मंदिर सुधारणा आणि नाल्यांची बांधकामे यांमुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होणार आहे.

सामाजिक न्याय विभाग अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (२०२५-२६) अंतर्गत २ कोटी रुपये निधी दलित वस्ती स्मशानभूमी, सामाजिक सभागृह, रस्ते व एलईडी पथदिवे आदी कामांसाठी मंजूरी मिळाली आहे.

इतर मागास व बहुजन कल्याण विभाग अंतर्गत वसंतराव नाईक तांडा-वस्ती सुधार योजना अंतर्गत १.५ कोटी रुपये निधी मंजूरी मिळाली असून या निधीमुळे तांडा-वस्ती भागात वीज, पाणी, रस्ते आणि नाल्यांच्या मूलभूत सोयीसुविधा उभारता येणार आहेत. यामुळे नागरिकांचे जीवनमान सुधारेल, असा विश्वास व्यक्त नागरिकांतुन करण्यात आला आहे.

या महत्त्वपूर्ण मंजुरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,पर्यटन मंत्री शंभू राजे देसाई,इतर मागास कल्याणमंत्री अतुल सावे तसेच भाजपा महायुती सरकार व आ.सुरेश धस यांचे नागरिकांकडून समाधान व मनःपूर्वक आभार मानले जात आहेत. या भरघोस निधीने पुन्हा एकदा फडवणीस साहेबांनी आष्टी साठी विकास निधीचे झुकते माप दीले असे बोलले तर वावगे ठरणार नाही.

# अंबाजोगाई तालुक्यात मुसळधार पाऊस; सोयाबीनचे पीक पाण्यात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यात मंगळवारी सायंकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी काढलेले सोयाबीन शेतात किंवा अंगणात सुकवण्यासाठी ठेवलेले असताना अचानक आलेल्या पावसामुळे हे सर्व ढिग पाण्यात भिजले.

पावसामुळे शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, काही ठिकाणी नाल्यांना पूर आला आहे. गावोगावी शेतकरी आपल्या साठवलेल्या सोयाबीनला वाचवण्यासाठी धडपड करताना





दिसत आहेत.अंबाजोगाई तालुक्यातील काही परिसरात रब्बी पेरणी सुद्धा पुर्ण झालेली आहे. व पाऊस जास्त झाल्यामुळे कोवळी पिके वाया जाण्याची शक्यता दिसून येत आहे. तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेती आणि जनजीवन दोन्ही विस्कळीत झाले आहे. शेतातील पिके पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सोयाबीन, मूग, उडीद, तूर आणि कापूस या पिकांना फटका बसला असून अनेक शेतकऱ्यांचे तयार उत्पादन पावसामुळे नष्ट झाले आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना देखील अडचणींचा सामना करावा लागत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस पावसाची शक्यता राहणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पाटोदा डॉक्टर असोसिएशन व किसान सभेच्यावतीने डॉ. संपदा मुंडे घटनेचा निषेध

पाटोदा । प्रतिनिधी

फलटण येथे घडलेल्या डॉ. संपदा मुंडे यांच्या दुर्दैवी मृत्यूच्या घटनेचा तीव्र निषेध पाटोदा तालुक्यातील डॉक्टर असोसिएशन व किसान सभेच्यावतीने करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ कठोर शिक्षा व्हावी तसेच अशा अमानवी घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.या संदर्भात डॉक्टर असोसिएशन व किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी पाटोदा तहसीलदार यांना निवेदन सादर केले. निवेदन देताना प्रमुख उपस्थितीत डॉक्टर, शेतकरी नेते,



सामाजिक कार्यकर्ते यांची मोठी उपस्थिती होती.या वेळी वक्त्यांनी म्हटले की, ''महिला डॉक्टरवर झालेली ही घटना अत्यंत संतापजनक असून संपूर्ण वैद्यकीय व सामाजिक क्षेत्र या घटनेने हादरले आहे. शासनाने आरोपींना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा द्यावी.''या निषेध आंदोलनात पाटोदा डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,पदाधिकारी डॉक्टर,व किसान सभेचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक सत्संगाकरिता दिल्लीस रवाना

जालना । प्रतिनिधी

दिल्ली येथे होणाऱ्या समागम सत्संग - २०२५ या भव्य आध्यात्मिक सोहळ्यासाठी जालना जिल्ह्यासह नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनेक संत निरंकारी भाविक आज दि.२९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या सत्संगाकरिता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून मागील तीन वर्षापूर्वी सुरु करण्यात आलेल्या नांदेड ते पानिपत या विशेष रेल्वे गाडीने आज रवाना झाले.

जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक जालना रेल्वे स्थानकावरून या विशेष रेल्वेने



सर्व जन रवाना होत असताना भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, बाबासाहेब भोजने ,जालना जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे, नगरसेविका सौ. संध्याताई देठे, कपिल दहेकर यांच्या उपस्थितीमध्ये या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला व सकाळी ११.३० वा हि रेल्वे गाडी जालना रेल्वे स्थानकावरून पुढील प्रवासाकरिता रवाना झाली.

यावेळी बोलताना शुभेच्छा पर बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, या जिल्ह्याचे लोकनेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे रेल्वे राज्यमंत्री असताना जालना जिल्ह्याला अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून दिल्या ज्यामध्ये जनशताब्दी एक्स्प्रेस, वंदेभारत एक्स्प्रेस, ओखा एक्स्प्रेस, छपरा एक्स्प्रेस इत्यादी गाड्यासह अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून जालना जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, तीर्थयात्री इत्यादीसह जनतेची होणारी प्रवासाची गैरसोय दूर केली. ते बघून मागील तीन वर्षापासून जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक उत्तर भारतात होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यासाठी जातात त्यासाठी त्यांनी दानवे साहेबाना विनंती करून विशेष रेल्वे गाडीची मागणी केली होती दानवे साहेबांनी स्वतः प्रयत्न करून या भाविकांची अडचण दूर करण्यासाठी अध्यात्मिक सोहळ्यासाठी नांदेड ते पानिपत हि विशेष गाडी सुरु करून ◀◀ पान ३ वर

# बशीरगंज ते नगरपरिषदेपर्यंतच्या रस्त्याची दैना फिटेना

## जागोजागी खड्डे मात्र भावी नगराध्यक्ष व नगरसेवक मुग गिळून गप्पच -डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रमुख मार्गांपैकी एक असलेल्या बशीरगंज ते नगरपरिषद कार्यालयापर्यंतचा रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी भरला असून, नागरिकांना व वाहनधारकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांत साचल्याने अपघाताचे प्रमाणही वाढले आहे.

या रस्त्यावर नगरपरिषद, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, नगररचना कार्यालय यांसारखी महत्त्वाची प्रशासकीय कार्यालये असून, नागरिकांना कामानिमित्त रोज या रस्त्याचा वापर करावा



लागतो. मात्र, रस्त्याच्या अत्यंत दुरवस्थेकडे संबंधित विभागांचे तसेच स्थानिक जनप्रतिनिधींचे पूर्ण दुर्लक्ष झाल्याची तीव्र नाराजी नागरिकांत व्यक्त होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी या परिस्थितीवर तीव्र संताप व्यक्त करत, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

''भावी नगराध्यक्ष आणि नगरसेवक मुग गिळून गप्पच'' डॉ. गणेश ढवळे

२४ मार्च रोजी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ''रस्त्यावरील खड्यांची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री अजितदादा पवार अवतरले'' या विषयावर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले होते. बशीरगंज कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी अजितदादांचे मुखवटे लावून प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

◀◀ पान ३ वर

# अरुंद रस्त्यामुळे तहसील कार्यालयासमोर दररोज वाहतूकीची कोंडी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसील कार्यालया समोरील अरुंद रस्ता आणि बेशिस्तपणे वाहनांची पार्किंग यामुळे सदरील ठिकाणची वाहतूक कोंडी नित्याची बनली आहे या वाहतूक कोंडीत नागरिकांचा श्वास दूध गुदमरला आहे शहर वाहतूक शाखा व नगरपालिका प्रशासन मात्र बघायची भूमिका घेत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे पाटोदा तहसील कार्यालयासमोरील रस्ता शेरवाशी यांच्या दृष्टीने ते महत्त्वाचा आहे तहसील कार्यालयासह पंचायत समिती उपविभागीय अधिकारी कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग शिक्षणाधिकारी कार्यालय न्यायालय व वसंतदादा पाटील महाविद्यालय कडे जाण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा असल्याने रस्त्यावर दररोज नेहमीच वाहनांची वर्दळ असते परंतु सदरील रस्त्याचं वर्ध असते मुळात रस्ता आनंद आहे त्यात वाहने पार्किंग केल्याने बेशिस्तपणे उभे केले जात आहेत यामुळे अरुंध रस्ता वाहतूक कोंडी दुसाकी स्वरांना तसं तास ताटकळत थांबावे लागते एवढेच नव्हे तर तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांना देखील जाण्यासाठी अनेक वेळा स्वतः वाहतूक नियंत्रकाचे कर्तव्य पार पाडत मार्ग काढावा लागतो पोलीस ठाणे जवळच असताना शहर वाहतूक शाखा सदरील वाहतूक कोंडीकडे दुर्लक्ष करीत आहेत याचा त्रास पाटोदा शेरवाशींना यांना होत आहे.

# डॉ.संपदा मुंडे हत्या प्रकरणी शासनाने एसआयटी स्थापन करावी -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २७ १० २०२५ जीवाला हुरहुर लावणारी घटना घडली आहे डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून हत्या आहे शारीरिक आणि मानसिक छळ होताच याची वेळीच तक्रार देऊन देखील वरिष्ठांना सांगूनही वेळीच तक्रारीची दखल घेतली गेली नाही त्यामुळे डॉ.संपदा मुंडे यांच्या आयुष्याचा प्रवास संपला भ्रष्ट व मगरुर पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याने अनेक वेळा मानसिक त्रास दिल्याचे उघड झाले आहे खासदाराने स्वतःच्या पी ए च्या माध्यमातून रिपोर्ट




बदलण्यासाठी प्रचंड दबाव आणून भयानक त्रास दिला या सर्व घटना साखळी पद्धतीने करणाऱ्या टीम मध्ये प्रशांत बनकर व यासारख्या अनेक नराधमाचा समावेश आहे ही सर्व ◀◀ पान ३ वर

# संपूर्ण कर्जमाफी, उसाला तीन हजार रुपये भाव न दिल्यास आंदोलन करणार -थावरे यांचा इशारा

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्यामध्ये प्रहार संघटना व अन्य शेतकरी संघटना यांनी मिळून संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्यासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले असून या आंदोलनास शेतकरी संघर्ष समितीचा जाहीर पाठिंबा असून संपूर्ण कर्जमाफी व ऊसाला तीन हजार रुपये भाव तात्काळ शासनाने द्यावा नसता शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा समितीचे अध्यक्ष गंगाभीषण थावरे यांनी दिला आहे.



त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की राज्यामध्ये पावसाने हाहाकार माजविल्यामुळे सर्व शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे नगदी पीक आसलेला कापूस सोयाबीन ही पिके हातची गेली असून शेतकऱ्यांनी दिवाळी अंधारात साजरी केली आहे. शासनाने तुटपुंजी मदत दिली असली तरी शेतकरी मात्र आर्थिक विवेचनेत सापडला आहे. त्यातच बँका कर्ज वसुलीसाठी तगादा लावत आहेत म्हणून शासनाने संपूर्ण कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा तसेच येत्या गाळप हंगामात शेतकऱ्यांच्या उसला तीन हजार रुपये भाव देण्याची घोषणा करावी या मागणीसाठी दि ०१ नोव्हेंबर रोजी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात इशारा भाई गंगाभीषण थावरे यांनी दिला आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा अवैध जुगार चालकाला दणका

## अंबाजोगाईतील सय्यद अन्वर सय्यद अजगर, चाँद इमाम गवळी या दोन अवैध मटका जुगार चालकांची एमपीडीए कायद्याअंतर्गत हार्सुल कारागृहात रवानगी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए व मोक्का कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले





आहे. त्या अनुषधांन पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरून प्रभारी अधिकारी पो.नि. पो.स्टे. अंबाजोगाई शहर यांनी दि.१८ सप्टेंब २०२५ रोजी इसम नामे सय्यद अन्वर सय्यद अजगर वय ४१ वर्षे (रा.खतीब गल्ली, अंबाजोगाई) व इसम नामे चाँद इमाम गवळी वय ४४ वर्षे (रा. गवळीपुरा अंबाजोगाई जि.बीड) यांचे विरुध्द एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता. त्या आधारे सदर इसमांना मंगळवार दि. २८ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेवून त्यांची रवानगी हार्सुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २९ ऑक्टोबर रोजी ७.४५ वाजता हजर करून स्थानबध्द केले आहे.

सदर स्थानबद्ध इसम क्रमांक एक याचे विरुध्द अंचाजोगाई शहर व अंबाजोगाई ग्रामीण येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे १ रुपयांचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ६ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने ◀◀ पान ३ वर

# आजपासून थोरल्या पाटांगणावर वार्षिकोत्सव ३० ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर भरगच्च कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

श्री जनी जनार्दन स्वामी महाराज संस्थान थोरले पाटगंण येथे वार्षिक महोत्सव गुरुवार ३० ऑक्टोबर पासून सुरू होत आहे, विविध धार्मिक कार्यक्रमाने भगवतभक्ती सागराचे रूप धारण करणाऱ्या या बीडच्या श्रद्धा आणि परंपरेच्या उत्सवाचे हे ४२५ वे वर्ष असून ६ नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व कार्यक्रमात सहभागी होऊन भगवतकृपा प्रसादाचा लाभ घ्यावा असे नम्र आवाहन मठाधिपती विनायक महाराज पाटंगणकर यांनी केले आहे.

गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी ज्ञानेश्वरीच्या अखंड पारायण सेवेने हा उत्सव प्रारंभ होत असून, शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी सोमयागी यज्ञ मार्तंड यज्ञेश्वर महाराज सेलुकर यांच्या





उपस्थितीत ''श्रीसूक्त हवन'' चा भव्य सोहळा, १ नोव्हेंबर रोजी स्थानिक नामवंत कलाकारांची भजन संध्या, दोन आणि तीन नोव्हेंबर रोजी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा, वय वर्ष ५ ते ११ आणि त्यापुढील दोन अशा गटात या स्पर्धेचे नियोजन केलेले आहे, या दिवशी सज्जनगड चे भूषणस्वामी महाराज यांची उपस्थिती आणि संत पूजन सोहळा होणार आहे, तर मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी वे.शा.सं. धुंडीराज शास्त्री पाटंगणकर स्मृती प्रित्यर्थ पुरस्कार सोहळा दुपारी ठीक ४ वाजता संपन्न होणारा आहे. यावर्षी पंडित प्रमोदशास्त्री कुलकर्णी (परभणी) यांना ''विद्वन्मणि'' हा पुरस्कार आणि भगवद्गीता सेवेतील सौ संध्या कुलकर्णी यांचा सत्कार यावेळी ईश्वर गुरुजी घनपाटी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे .

दि ५ नोव्हेंबर रोजी गीता पाठ आणि गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज ( अमृत महाराज जोशी) यांचे काल्याचे कीर्तन आणि महाप्रसाद होणार आहे. ७ नोव्हेंबर रोजी मठाधिपती श्री विनायक महाराज पाटंगणकर यांच्या ललिताच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# धर्माचं राजकारण ते पैशाची दलाली, हाच भाजपचा खरा चेहरा, जैन बोर्डिंग प्रकरणावरुन रोहित पवारांचा हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

**पुण्यातील जैन बोर्डिंगच्या जागेवरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. धर्माचं राजकारण ते पैशाची दलाली असे म्हणत रोहित पवार यांनी भाजपवर टीका केली आहे. त्यांनी ट्वीट करत ही टीका केलीय. जैन बोर्डिंगची जागा गिळंकृत करण्याचे बरेच प्रयत्न केले होते. परंतू सामान्य नागरिकांनी आवाज उठवताच बिल्डर्सबरोबर झालेली डील स्थगित करावी लागल्याचे रोहित पवार म्हणाले.**


राजकीय वरदहस्त असलेल्या लुटारु टोळींने जैन बोर्डिंगची जागा गिळंकृत करण्याचे बरेच प्रयत्न केले. परंतु या जागेबाबत आरोपांची राळ उठताच आणि जैन समाज व सामान्य नागरिकांनी आवाज उठवताच बिल्डर्सबरोबर झालेली डील स्थगित करावी लागली. आता जैन बोर्डिंगची जागा पुन्हा ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात येणार असल्याची माहिती मिळत असल्याचे रोहित पवार म्हणाले. इतके दिवस सरकार एकच सांगत होतं की, यामध्ये कोणताही गैरव्यवहार नाही. मग गैरव्यवहार झाला म्हणून जागा पुन्हा ट्रस्टकडं सुपूर्द केली जात असेल तर सरकारच्या जवळच्याच कुणालातरी यामधे मोठ्या प्रमाणात नफेखोरी करायची होती हे स्पष्ट होत असल्याची टीका रोहित पवार यांनी केली आहे. निवडणुका आल्या की जाती धर्माचं राजकारण करून राजकीय पोळी भाजायची आणि पैशाचा विषय आला की सरसकट दलाली खायची. हाच भाजपचा खरा चेहरा आणि Modus operandi असल्याची टीका रोहित पवार यांनी केली आहे. या प्रकरणात देखील त्यांना हेच करायचं होतं मात्र लोकांनीच यांचा बुरखा फाडल्यामुळे माघार घ्यावी लागली. भाजपच्या याच राक्षसी वृत्ती आणि प्रवृत्ती पासून प्रत्येकाने सतर्क राहणं गरजेचं आहे. असो! अखेर जैन बोर्डिंगसाठी ज्यांनी ज्यांनी आवाज उठवला, संघर्ष केला, त्या प्रत्येकाचं मनापासून अभिनंदन असे ट्वीट करत रोहित पवार यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. मागील काही दिवसांपासून पुण्यातील जैन बोर्डिंग जागा विक्री प्रकरणावरून राज्यातील राजकारण तापलं आहे. अशातच या ही जागा विकत घेणाऱ्या गोखले बिल्डर्सने या व्यवहारातून माघार घेतली.



# कायदा शिक्षणात मुलींचा दबदबा! पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमात सलग तिसऱ्या वर्षी मुलींची बाजी

पुणे । प्रतिनिधी

राज्य सीईटी सेलतर्फे यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यात आलेल्या पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत राज्यातील १६१ विधी महाविद्यालयांमध्ये एकूण १३ हजार ५९७ जागांपैकी १० हजार २६७ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. ही टक्केवारी ७५.५० इतकी असून, विधी अभ्यासक्रमाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सलग तिसऱ्या वर्षी मुलींनी आघाडी कायम ठेवली आहे. यावर्षी प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये ५३.१० टक्के मुलींचा समावेश आहे.



यंदा पाच वर्षीय विधी शाखेची प्रवेश प्रक्रिया ३० जूनपासून सुरू झाली. ही प्रक्रिया सुमारे तीन महिने सुरू होती. यामध्ये तीन मुख्य व एक संस्थात्मक अशा एकूण चार फेऱ्यांमध्ये हे प्रवेश पूर्ण करण्यात आले. मागील तीन वर्षांची आकडेवारी पाहिल्यास पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी सातत्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे.

यावर्षी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ११ हजार ३५६ जागांपैकी ९ हजार २७८ जागांवर प्रवेश झाले असून, कॅपअंतर्गत प्रवेशाची टक्केवारी ८१.७० इतकी आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (इब्ल्यूएस) राखीव असलेल्या जागांना मात्र अत्यंत कमी प्रतिसाद मिळाला आहे. या प्रवर्गासाठी ९६७ जागांपैकी केवळ ३२० जागांवर प्रवेश होऊन ६४७ जागा रिक्त राहिल्या. व्यवस्थापन कोट्यातील जागाही पूर्ण क्षमतेने भरलेल्या नाहीत. त्यातील १२७४ जागांपैकी ६६९ जागांवर प्रवेश होऊन ६०५ जागा रिक्त राहिल्या आहेत.

# म्हाडातर्फे ४,१८६ सदनिकांची विक्री; अर्जप्रक्रियेला या तारखेपर्यंत मुदतवाढ

पुणे : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ४ हजार १८६ सदनिकांच्या विक्रीकरिता आयोजित संगणकीय सोडतीसाठी अर्ज सादर करण्यासाठी २१ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.सुधारित वेळापत्रकानुसार पुणे मंडळातर्फे सदनिका वितरणासाठी प्राप्त अर्जांची संगणकीय सोडत आता ११ डिसेंबर, रोजी दुपारी १२ वाजता काढण्यात येणार आहे.

पुणे मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली सोडत चार घटकांमध्ये विभागण्यात आली असून, यामध्ये म्हाडा गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत १६८३ सदनिका, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या योजनेअंतर्गत २९९ सदनिका, १५ टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील ८६४ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका, चिंचवड




महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील एकूण ३२२२ सदनिकांचा समावेश आहे.

मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी संगितले की, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी व इतर कारणास्तव अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याविषयी नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात आली. यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावरील योजनांच्या सदनिकांसाठी संकेतस्थळावर नोंदणी करावी. अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेकरिता मार्गदर्शन करणारी माहिती पुस्तिका म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्जदारांच्या सोयीसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियेबाबत मदतीसाठी ०२२-६९४६८१०० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन साकोरे यांनी केले आहे.

म्हाडाने गेल्यावर्षी ऑगस्टमध्ये काढण्यात आलेल्या सोडतीतील १ हजार ३०० शिल्लक राहिलेली घरेही या सोडतीत समाविष्ट केली आहेत. या सोडतीत आतापर्यंत ६२ हजार ११ अर्ज आले असून, ३५ हजार ९१३ जणांनी अनामत रक्कम भरली आहे. त्यानुसार आतापर्यंत ६२ कोटी २५ लाख २८ हजार ५८४ रुपयांची अनामत रक्कम जमा झाली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# अजित पवारांचे निकटवर्ती यशवंत माने भाजपमध्ये

इंदापूर । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्ती शेळगाव(ता.इंदापूर)येथील सुपुत्र व सोलापूर जिल्हातील मोहोळ विधानसभा मतदारसंघांचे माजी आमदार यशवंत विठ्ठल माने यांनी पवार यांची २५ वर्षानी साथ सोडली असून त्यांनी आज मुंबई येथे शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते व माजी आमदार राजन पाटील यांच्या समवेत भाजप पक्षात जाहीर प्रवेश झाला आहे.**




भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण,ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रमुख उपस्थितीत भाजप मध्ये शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत प्रवेश केला आहे.

आगामी काळात दळ पंतप्रधान नरेंद्र मोदी,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली व नेतृत्वखाली मोहोळ मतदारसंघात तसेच सोलापूर ,पुणे जिल्हातील भाजपा मधील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना सोबत घेवून पक्ष संघटना मजबुतीकरण करण्यासाठी काम करणार आहे असे भाजपा पक्षात दाखल झालेले माजी आमदार यशवंत माने यांनी म्हटले. यशवंत माने पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील शेळगाव गावचे सुपुत्र असून ते सन १९९९ पासून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये व उप मुख्यमंत्री अजित पवार यांचे बरोबर पक्षात काम करत विविध पदावरती पक्ष संघटनेमध्ये व विविध राजकीय संस्थेवरती काम पाहिलेले आहे. माने यांचे इंदापूर तालुक्यामध्ये गावोगावी मोठा चाहता वर्ग मोठा असून त्यांचा मोठा जनसंपर्क इंदापूर तालुक्यासह पुणे जिल्ह्यात आहे.त्याचा फायदा इंदापूर तालुका भारतीय जनता पार्टीला आगामी काळातील निवडणुकी मध्ये होणार असून माने यांच्या भाजपा प्रवेशाने इंदापूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. इंदापूर तालुका भाजप पक्षाला मोठा आधार मिळाला आहे.

मोहोळ बरोबरच इंदापूर तालुक्यातील भारतीय जनता पक्ष अधिक बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना सोबत घेवून कामकाज करणार असल्याचे देखील माने यांनी सांगितले आहे.

# ज्ञानोबा माऊलींच्या पवित्र भूमीत 'वारकरी भवना'चे लोकार्पण

आळंदी । प्रतिनिधी

ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र भूमीत 'कै. द. ग. तटकरे वारकरी भवन' या नव्या इमारतीचा लोकार्पण सोहळा आज मोठ्या उत्साहात पार पडला. या भवनाचे लोकार्पण राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी खासदार तटकरे म्हणाले, ज्ञानेश्वर माऊलींच्या आळंदीत उभे राहिलेले हे वारकरी भवन केवळ चिंतन-भजनाचे स्थळ नसून, वारकरी परंपरेतील श्रद्धा, संस्कार आणि सेवाभावाचा प्रसार करणारे प्रेरणास्थान ठरेल.



या भवनाला माझ्या वडिलांचे नाव देण्यात आले, हे माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. या उपक्रमाबद्दल मी वारकरी संप्रदाय मंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो. या वारकरी भवनाच्या माध्यमातून भक्तांना माऊलींच्या सानिध्यात भक्तीरसाचा अनुभव घेण्यास एक सुंदर परिसर उपलब्ध झाला आहे. वारकरी परंपरेच्या संवर्धनासाठी भविष्यातही कार्य करण्याचा मी संकल्प करीत आहे.

यावेळी तटकरे यांनी संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात जाऊन माऊलींचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीच्या वतीने प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ व विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील, माजी आमदार सुनील टिंगरे, माजी सभापती डी. डी. भोसले पाटील, माजी नगरसेविका मंगलाताई वेळकर, रुपाली पानसरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सौरभ गव्हाणे, निसार सय्यद व पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी तसेच कोकण दिंडी वारकरी संप्रदाय मंडळ, रोहा येथील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंदापूरमध्ये सुरु होणार प्रगत मत्स्य महाविद्यालय – भरणे

इंदापूर । प्रतिनिधी

राज्यातील मत्स्य व्यवसायाच्या प्रगतीसाठी आणि शाश्वत जलउत्पादन व्यवस्थापनासाठी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पुणे जिल्ह्याच्या इंदापूर तालुक्यात नवीन मत्स्य महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या संदर्भात आवश्यक जमीन, बांधकाम आराखडा आणि निधी नियोजनाबाबत प्राथमिक अहवाल सादर करण्यात आला असून, शासनस्तरावर निधी मंजुरीची प्रक्रिया लवकरच सुरू होईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. यासंदर्भात बोलताना मंत्री भरणे म्हणाले, इंदापूर तालुक्यात स्थापन होणारे मत्स्य महाविद्यालय हे राज्यातील पहिले तंत्रज्ञानाधारित मत्स्य शिक्षण व संशोधन केंद्र असणार आहे. या महाविद्यालयात आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञान, जलसंसाधन व्यवस्थापन, मत्स्यजन्य उत्पादने प्रक्रिया, निर्यात गुणवत्ता प्रशिक्षण आणि जलचर जैवविविधता संवर्धन यांसारख्या विषयांवर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येतील, असे ते म्हणाले. या बैठकीला राज्यसभेचे खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, सौर विभागाचे प्रधान सचिव भ. विजय, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., मत्स्यव्यवसाय विभागाचे आयुक्त किशोर तावडे, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार आणि पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी उपस्थित होते.

# बिबट्याचा बंदोबस्त करा! संतप्त ग्रामस्थ वनमंत्र्यांना भेटले, गणेश नाईकांनी दिले 'हे' मोठे आश्वासन

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर, आंबेगाव, खेड आणि जुन्नर तालुक्यांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या मंत्रालय दालनात तालुक्यातील सरपंच, ग्रामस्थ आणि स्थानिक संघटनांच्या प्रतिनिधींनी भेट घेऊन बिबट्याच्या हल्ल्यांमुळे मृत्यू पावलेल्या कुटुंबांना मदत आणि बिबट्याच्या बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.



या प्रतिनिधीमंडळात शिरूर तालुक्यातील फाकटे, वडनेर खुर्द, पिंपरखेड, टाकळी हाजी, म्हसे यासह आंबेगाव तालुक्यातील लाखनगाव, देवगाव, पारगाव तर्फे अवसरी आदी गावांतील ग्रामस्थ व शिवबा संघटनेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.या शिष्टमंडळाने बिबट्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायमस्वरूपी बंदोबस्त यंत्रणा उभी करावी, मृत पावलेल्या नागरिकांच्या कुटुंबांना योग्य नुकसानभरपाई व शासकीय मदत तातडीने देण्यात यावी, तसेच गावागावांत पिंजरे, प्रकाशयोजना आणि वनपथकांची गस्त वाढविणे यांसारख्या ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली.वनमंत्री गणेश नाईक यांनी सर्व मागण्यांवर सविस्तर चर्चा करून तातडीने अधिकाऱ्यांना शिरूर तालुक्यातील परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले. लवकरच सर्व सरपंच, ग्रामस्थ व संबंधित विभागीय अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक आयोजित करून ठोस निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिल्याचे फाकटे येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर उर्फ नितीन पिंगळे यांनी सांगितले. या भेटीचे आयोजन अजय चव्हाण यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

# वृद्ध नातेवाईकाचा १७ वर्षांच्या मुलीवर बलात्कार

## ३ महिन्यांची गर्भवती राहिल्यानंतर संतापनजक घटना उघड

इंदापूर । प्रतिनिधी

**शेळगाव (ता. इंदापूर) येथील एक १७ वर्षीय अल्पवयीन पीडितेवर तिच्याच वृद्ध नातेवाईकाने बलात्कार केला. याप्रकरणी पोलिस तक्रारीनंतर नराधम नातेवाईकाच्या मुसक्या वालचंदनगर पोलिसांनी आवळल्या. या घटनेबद्दल शेळगाव परिसरातून संताप व्यक्त होत आहे. आरोपी नातेवाईकावर विविध कलमातंर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

वालचंदनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेळगाव येथे पीडित मुलगी आपल्या कुटुंबियांसमवेत संबंधित वृद्ध नातेवाईकाच्या घराजवळ सन २००८ पासून राहत आहे. पीडितेच्या नातेवाईकाचे तिच्या घरी सतत ये-जा होती. मागील १० दिवसांपूर्वी पीडिता ही मावशीकडे आली व माझ्या पोटात दुखत असून मला मासिक पाळी येत नाही असे तिने सांगितले. सोमवारी (दि. २७) मावशीने पीडितेला इंदापूर शासकीय रुग्णालयात नेले.

तेथे तपासणी केली असती ती तीन महिन्याची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पीडितेस मावशीने या घटनेबाबत विचारणा केली असता तिने सांगितले की, मागील तीन महिन्यांपूर्वी आपले एक नातेवाईक दुपारी घरी आले होते. त्यांनी माझ्यावर जबरदस्ती केली. शिवाय या घटनेबद्दल कुणाला सांगितले तर तुझा आई-वडिलांना मारून टाकेन, अशी धमकी दिली. धमकी दिल्यामुळे पीडितेने या प्रकाराबदल कोणाला सांगितले नाही. परंतु पीडितेला त्रास होऊ लागल्याने हा प्रकार घडकीस आला. या प्रकारबद्दल शेळगाव परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत असून या घटनेची फिर्याद पीडितेच्या आईने दिली.संबंधित नराधम वृद्ध नातेवाईक आरोपीस पोलिसांनी अटक केली असून न्यायालयात उपस्थित केले असतात त्याला १ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# जैन बोर्डिंगचे २३० कोटी रुपये गोठवा, सर्व ट्रस्टींना बरखास्त करा – धंगेकर यांची मागणी




पुणे । प्रतिनिधी

जैन बोर्डिंग जमीन विक्रीचा व्यवहार रद्द झाल्यास त्यातील २३० कोटी रुपयांची रक्कम गोठवावी. याबरोबरच राज्य शासनाने सगळ्या ट्रस्टींना बरखास्त करून प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणी शिवसेना (शिंदे) पक्षाचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी केली आहे.जैन बोर्डिंग ट्रस्टच्या जमीन व्यवहाराची मंगळवारी (दि. २८) रोजी धर्मादाय आयुक्तांकडे सुनावणी झाली. त्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी माध्यमांशी संवाद साधला.

ट्रस्टच्या जागेच्या व्यवहारातून माघार घेण्याची तयारी दर्शविलेल्या गोखले बिल्डरने जो करार या जागेच्या विक्रीच्या दरम्यान केला होता, त्या करारात असे नमूद आहे, की जर बिल्डरच्या बाजूने बॅक आउट झाले, तर संबंधित रक्कम परत देण्यात येणार नाही. आता जैन बोर्डिंग ट्रस्टच्या विक्रीमध्ये जी २३० कोटी रुपयांची रक्कम बिल्डर करून ट्रस्टला मिळालेली आहे. ती रक्कम गोठविण्यात यावी.पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची जमीन खरेदी करताना कुठल्याही कागदपत्रांची पडताळणी न करता केलेल्या व्यवहाराबद्दल व अशा प्रकारे जमीन चोरी करणाऱ्या टोळीला धडा बसविण्यासाठी २३० कोटी रुपयांची रक्कम जप्त करत ती ट्रस्टच्या कल्याणासाठी वापरण्यात यावी, असेही धंगेकर यांनी स्पष्ट केले आहे.यापुढील काळात ट्रस्ट चालविण्यासाठी जैन समाजातील चांगल्या सामाजिक कार्य करणाऱ्या मंडळींची या ट्रस्टवर निवड करण्यात यावी. काही न्यायमूर्ती, तसेच आयएएस अधिकाऱ्यांची देखील निवड करण्यात यावी, असे धंगेकर यांनी सांगितले आहे.

# कारच्या ड्रायव्हिंग सीटवरच तरुणाचा गळा चिरून निर्घृण खून; ४ संशयित ताब्यात

चाकण । प्रतिनिधी

शहराजवळील नाणेकरवाडीत एका तरुणाचा चारचाकी मोटारीमध्येच गळा चिरून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्राथमिक तपासात ही घटना पूर्व वैमनस्यातून घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विकास लक्ष्मण नाणेकर (वय ४४, रा. सुदाम्याचे पोहे अपार्टमेंट शेजारी, नाणेकरवाडी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. २८) सकाळी ड्रायव्हिंग सीटवर बसलेल्या स्थितीतील मृतदेह रक्ताने भरलेल्या अवस्थेत दिसून आल्यानंतर घटना उघडकीस आली आहे.




घटनेची माहिती मिळताच चाकण पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. शव ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. चाकण पोलिसांनी याप्रकरणी चार संशयितांना ताब्यात घेतले आहे. श्वान पथकांच्या मदतीने परिसरात पाहणी करण्यात येत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चाकणसह नाणेकरवाडी परिसरात तणावपूर्ण शांतता असली तरी चाकण पोलिसांनी या भागात कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

cmyk